शुक्रवार, २१ जून २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २८८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक



●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 21 JUNE 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-288 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05



## शिवराज्याभिषेक सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

*शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या ३५१ वर्षारंभानिमित्त गुरूवारी स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावर आयोजित विविध कार्यक्रमांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सहभाग घेतला. स्वराज्यसंस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले, स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ माँसाहेब, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याचे, विचारांचे, पराक्रमाचे स्मरण करून स्वराज्य निर्मितीसाठी रक्त सांडणाऱ्या, जिवाची बाजी लावणाऱ्या सह्याद्रीच्या मावळ्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कृतज्ञतापूर्ण वंदन केले. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त देशभरातील तमाम शिवप्रेमींना, शिवभक्तांना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी शुभेच्छा दिल्या.*

# चुकीच्या धोरणांमुळे ओबीसींना आरक्षण जाण्याची भीती

## विजय वडेट्टीवार : प्रा. लक्ष्मण हाकेंची खालावलेली तब्येत पाहून अश्रू अनावर

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : आंदोलनाकडे माझे लक्ष होते. दोन दिवस आधी येणार होतो. कालही आणि आजही मुख्यंत्र्यांशी बोललो. समाजासाठी आपण उपोषण केले. ओबीसीमध्ये जन्मलो म्हणून ओबीसीच्या पाठीमागे राहणे माझे जबाबदारी आणि कर्तव्य आहे. सत्ता, पदे येतात आणि जातात. पण मी कधी याचा विचार केला नाही. मी मंत्रिपद सोडून समाजासोबत राहिलो. 65 टक्के आरक्षण गेले ते मान्य करत येत नाही. आहे तेवढे मान्य करावे लागेल असे कोर्ट म्हणते. फुले-शाहू-आंबेडकरांचे राज्य आहे पण 2014 नंतर हे बदलले. सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे आमच्या हक्काचे जाईल का ही भीती निर्माण झाली आहे, अशी टीका गुरूवारी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केंद्र सरकारवर केली.**



**शिष्टमंडळाची भेट वांझोटीच ठरणार : प्रा. लक्ष्मण हाके**
दरम्यान, 8 दिवस झाले तरी सरकार पुन्हा चर्चाच करणार असेल तर उद्याची भेट वांझोटीच ठरेल, अशी निराशा लक्ष्मण हाके यांनी व्यक्त केली. मराठ्यांनी आणि ओबीसींनी एकमेकांची एकमेकांबद्दलची भूमिका समजून घेतली. तर संघर्ष संपेल. भविष्यात मराठे आणि ओबीसी एकत्र आले तर राज्य काय दिल्लीचे दार उघडतील. मात्र प्रस्थापित मराठा आणि ओबीसी नेत्यांनी या दोन्ही समाजाला जाणीवपूर्वक एकत्र येऊच दिले नाही. मात्र हे अशक्य नाही असा आशावाद सुद्धा हाके यांनी बोलून दाखवला. दुसरे उपोषणकर्ते नवनाथ वाघमारे यांनी मराठ्यांना ओबीसीमध्ये प्रवेश मुळातच संशयास्पद असल्याचे सांगितले.

ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर प्रा. लक्ष्मण हाके आंदोलन करत आहेत. गुरूवारी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी उपोषणस्थळी जाऊन भेट घेतली. यावेळी हाके यांच्या तब्येतीची विचारपूस केली. हाके यांची खालावलेली तब्येत पाहून वडेट्टीवार यांना अश्रू अनावर झाले. वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फोन लावला. यावेळी, हाके यांना तब्येतीची काळजी घ्यायला लावा. उद्या शिष्टमंडळ पाठवतो. त्यांच्यासोबत चर्चा करेल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी वडेट्टीवार यांना दिले. सगे-सोयरेची मागणीबद्दल आयोगाची जबाबदारी आहे आणि हक्काचे संरक्षण होईल. सरकारमधील मंत्री म्हणाले की, सगे सोयरे टिकणार नाही. मग देत कशाला याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल. मीडियाला विनंती करतो. एकमेकांचे मित्र आज शत्रू होत आहेत. हे वातावरण का होतेय समजून घेतले पाहिजे. आता आंदोलन लवकर संपवा नाही तर वातावरण बिघडेल आमचा गळा दाबून कुणी मारत असेल तर आम्हाला शांत बसता येणार नाही. अधिवेशनामध्ये आम्ही हा विषय पहिल्या दिवसापासून उचलू. फ्लोरमध्ये सांगा आम्ही ओबीसीला धक्का लागू देणार नाही आणि लेखी स्वरूपात सुद्धा सांगावे, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली.






# श्रीक्षेत्र राजुरेश्वर मंदिरास पर्यटन स्थळाचा 'अ' दर्जा प्राप्त

## केंद्रीयमंत्री दानवेंच्या प्रयत्नांना यश, मिठाई व फटाक्यांच्या आतिषबाजीने निर्णयाचे स्वागत, आ. संतोष दानवे, आ. नारायण कुचे यांच्या हस्ते महापूजा

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**जालना :** भोकरदन तालुक्यातील श्रीक्षेत्र राजुर महागणपती मंदिर हे धार्मिक स्थळ म्हणून मराठवाड्यात प्रसिद्ध आहे. प्राचीन काळापासून मंदिरास सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.दरवर्षी लाखो भाविक राजुरेश्वराच्या दर्शनासाठी येत असतात.नुकतेच महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाने श्रीक्षेत्र राजूर मंदिरास पर्यटन स्थळाचा 'अ'दर्जा बहाल केला आहे.केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले आहे.यानिमित्त आमदार संतोष पाटील दानवे, आमदार नारायण कुचे यांच्या हस्ते राजुरेश्वरांची पूजा व महाआरती करण्यात आली.यावेळी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून शासन निर्णयाचे स्वागत केले. राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या वतीने श्रीक्षेत्र राजुर पर्यटन स्थळास 'अ 'दर्जा प्राप्त झाला असून त्यामुळे मंदिर परिसराचा विकास होऊन पर्यटनास चालना मिळणार आहे. केंद्रीयमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रयत्नामुळे हे यश मिळाल्याची भावना नागरिक व कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. फटाक्यांची आतिषबाजी करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी सुधाकरराव दानवे, श्रीरामपंच पुंगळे, गणेशराव साबळे, प्रशांत दानवे, भाऊसाहेब भुजंग, भगवानराव नागवे, संतोष मगरे, गजानन नागवे, रामलाल चव्हाण, जगनराव पवार, पंढरीनाथ करपे, आप्पासाहेब साखरे, रामदास तळेकर, रतन ठोंबरे, सारंगधर बोडखे, रामेश्वर कढवणे, सुखानंद पारवे, ज्ञानेश्वर पुंगळे, राहुल दरख, रामेश्वर पडोळ, नवनाथ फुके, आप्पासाहेब पुंगळे, परमेश्वर पुंगळे, रावसाहेब ठोंबरे, मुन्नाशेठ शेखावत, रामचंद्र नागवे, शरद थोटे, तुळशीराम गायकवाड, मोहिनीराज मापारी, रामदास तळेकर, हरिभाऊ काळे, लक्ष्मण कांबळे यासह कार्येकर्ते व गणपती संस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते.



## वड म्हणला बाई तुला दोन्ही हात जोडले !

आधुनिक केसरी

*एक बाई लगबगीनं
पूजे साठी आली
भक्ती भावाने वडाला
चकरा मारू लागली*

*वड देवा वड देवा
पूजा पदरात घे
जन्मोजन्मी पुन्हा मला
हाच पती दे*

*आश्चर्याने वडाने विचारलं
हाच नवरा पाहिजे ?
काहीही म्हण बाई तुला
खरंच मानलं पाहिजे*

*काय करणार वडदादा
खूप विचार केला
हाच नवरा राहूदे म्हणून
आतून आवाज आला*

*एवढे दुर्गुण असून सुद्धा
त्याचीच निवड केली
म्हणून माय मला तुझी
खूपच दया आली*

*वडदेवा वडदेवा
तसं काहीच नाही
असं नाही की आमचं
बिल्कुलच पटत नाही*

*दुसरा नवरा मागायचा
मी ही विचार केला
पण कल्पनेनंच माझा जीव
कासावीस झाला*

*जास्तच बिलिंदर
निघाल्यावर
मग काय करायचं
म्हणून म्हणलं याच्यासाठीच
वडाभोवती फिरायचं*

*तुम्हाला तर माहितीय देवा
मी ही कमी नाही
बिचाऱ्याचा डोक्याला
केस ठेवला नाही*

*अधून मधून गुर्रगुर करतं
मी थोडंच ऐकते
एका कानांन ऐकूण
दुसऱ्याने सोडून देते*


*माझी आई मला म्हणली
नवरा बदलायचा नाही
एवढा बावळट माणूस तुला
कधीच मिळायचा नाही*

*तुम्हीच सांगा वड दादा
आईचं मन मोडू का ?
नशिबाने मिळालेलं
चांगलं माणूस सोडू का ?*

*वयोवृद्ध झाडाने पण
गडगडाटी हास्य केले
वड म्हणला बाई तुला
दोन्ही हात जोडले*

*न विसरता दरवर्षी
पूजेसाठी येत जा
झाडासाठी आयुष्यातला
थोडा वेळ देत जा*

प्रा.विजय पोहनेरकर
9420929389
औरंगाबाद




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

याही प्रश्नाचं उत्तर द्यायला तज्ज्ञाची गरज नाही. कारण ते आपल्याला माहिती आहे. जेव्हा आपण एक बोट दुसऱ्याकडे दाखवतो, तेव्हा चार बोटं आपल्याकडे आपसूक वळालेली असतात. प्रदूषणाचा त्रास आपल्याबरोबरच निसर्गातील सर्व घटक, पशुपक्षी इ ना सुद्धा होतो. पण ते आपल्यापेक्षा निसर्गाच्या अधिक जवळ असतात. नैसर्गिक पद्धतीने जीवन जगतात. मुख्य म्हणजे आपल्याप्रमाणे मनावर ताणतणाव घेत नाहीत. त्यामुळे प्रदूषणाच्या विळख्यात सापडुनही ते बऱ्याच प्रमाणात आरोग्यदायी जीवन जगतात. आपण मात्र रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, कर्करोग इ विकारांनी त्रस्त झालो आहोत. दवाखान्याच्या पायऱ्या झिजवत आहोत. डॉ च्या सांगण्यावरून निरनिराळ्या तपासण्या करून त्यांच्या फाईल्स छानपैकी सांभाळून ठेवतो आहोत. आरोग्य, मनाची शांतता मात्र हरवली आहे. हरवले ते गवसेल का ? प्रयत्न केला तर मिळू शकते. अवघड आहे पण अशक्य नाही. पण कोणतीही गोष्ट प्राप्त करायची असेल तर काहीतरी योगदान तर द्यावेच लागणार ना ? त्याची तयारी आपल्याला ठेवावी लागेल. आपण लहान असतानाचं जीवन आठवा . आपण शाळेत जात होतो तेव्हा आपल्याला ताणतणाव नव्हते का ?




## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

गोदावरी नदीच्या तीरी चंद्रगिरी नावाच्या गावी एका ब्राह्मण स्त्रीस गर्भसंभव होऊन गोरक्षनाथ जन्मल्याचेही सांगतात.



गोपीचंदाची आई मैनावती ही गोरक्षनाथांची शिष्या होती. नेपाळी परंपरेनुसार दक्षिणेकडील वडव नावाच्या देशात महामंत्राच्या प्रसादाने महाबुद्धिशाली गोरक्षनाथांचा जन्म झाला. क्रूक्स आणि गियर्सन यांच्या मते सत्ययुगात पंजाबमध्ये, त्रेतायुगात गोरखपुरामध्ये, द्वापरयुगात हुरभुजमध्ये व कलियुगात काठेवाडात गोरखमढी येथे गोरखनाथ यांनी अवतार घेतले. गोरक्षनाथांनी नेपाळ, पंजाब, बंगाल, कच्छ, काठेवाड, नासिक, उडिसा इत्यादींच्या यात्रा केल्या होत्या. गोरक्षनाथांचा जन्म, त्यांचे कार्य, त्यांचे पंथिय तत्वज्ञान यांचा अभ्यास आजकाल वाढत आहे. डॉ. कल्याणी मल्लीक, डॉ. प्रबोधचंद्र बागची, डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी, डॉ. मोहनसिंग इत्यादी संशोधकांच्या अभ्यासामुळे श्रीगोरक्षनाथांच्या कार्यावर नवा प्रकाश पडत आहे. मोहनसिंग यांच्या मतानुसार गोरक्षनाथ हे एका हिंदू विधवेचे अवैध पुत्र असावेत. समाजात त्यामुळे खालचे स्थान मिळाल्याने त्यांनी स्वपराक्रमाने वैचारिक क्रांती केली. गोरक्षसिद्धान्तसंग्रहात त्यांना 'ईश्वरी संतान' (बेवारशी) म्हटले आहे. 'मतिरत्नाकर' नावाच्या महानुभवी ग्रंथात तर गोरक्षनाथांसंबंधी म्हटले आहे, 'आणि गोरक्ष जन्मला शूद्र कुळीं.' त्यांचा जन्म ब्राह्मणकुळात झाला असल्याचेही काही संशोधक सांगतात. त्यांचे वैराग्य प्रखर होते. आपल्या वैराग्यपूर्ण मार्गावरून घसरणाऱ्या आपल्या गुरूस, म्हणजे मत्स्येन्द्रनाथास त्यांनी सावरले. म्हणून की काय ज्ञानेश्वर त्यांना 'विशयविध्वंसैकवीर' म्हणतात. त्यांचा संचार सर्व भारतभर असून अमरनाथ, गहिनीनाथ, निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर ही शिष्यपरंपरा महाराष्ट्राच्या दृष्टीने फ़ारच महत्त्वाची आहे. गोरखनाथांचा एक महत्त्वाचा विशेष असा की, त्यांनी सर्वसामान्य लोकांसाठी आपला धर्मविचार लोकभाषांतून सांगितला. संस्कृत, प्राकृत वा अपभ्रंशमिश्र हिंदी अशा भाषांतून त्यांचे ग्रंथ मिळतात. अमनस्कयोग, ज्ञानदीपप्रबोध, गोरक्षपद्धती, गोरक्षसंहिता, योगमार्तंड, गोरक्षकल्प, अवधूतगीता, गोरक्षगीता, गोरखबानी; असे काही ग्रंथ गोरक्षनाथांच्या नावावर मिळतात. अमरौघशासनम, महार्थमंजरी, सिद्धसिद्धान्तपद्धती; हेही ग्रंथ गोरक्षनाथांचे म्हणून सांगतात. योगधारणा, पिंडब्रह्मांडविचार, कुंडलिनीजागृती, गुरुचे महत्व, देशकालातीत व जातिभेदातीत तत्वज्ञान, लोकभाषांचा उपयोग; हे गोरक्षनाथांच्या पंथांचे मुख्य विशेष होत. हिंदू व मुसलमान एका विचारावर प्रथम वावरले ते गोरक्षनाथांच्या परिवारात. नाथपंथाच्या रावळ शाखेत आजही मुसलमानांचा भरणा विशेष दिसतो. नाथपंथात स्त्रीशूद्रांच्या उद्धाराची तळमळही प्रामुख्याने दिसते. विमलादेवी व मैनावती या दोन स्त्रिया नाथपंथात होत्या. बंगालमधील नाथपंथीय हडिपा (जालंदरनाथ) हा एक अंत्यज होता. गोरखनाथांच्या प्रेरणेमधूनच भाषेचा उपयोग अखिल भारताच्या संदर्भात होत राहिला.




आधुनिक केसरी

## अभंगात न्हाली | तुकोबाच्या ||

आंधळा विश्वास | पांगळा करतो ||
भार वाढवतो | वेदनांचा ||१||
सुखाचा सुगावा | शोधूनी सापडेना ||
मनाची भावना | पंगु झाली ||२||
सुटता सुटेना | कोडे अंतरीचे ||
ओझे आनाथाचे | पेलु कैसे ||३||
क्षितिजात गुंजे | अनाहत नाद ||
टाळांचा निनाद | कानी आला ||४||
विश्वासाची वारी | आता धन्य झाली ||
अभंगात न्हाली | तुकोबाच्या ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज

पुष्प ९५वे



### गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### भगवंताचे स्मरण नाही !


नामस्मरण करताना मनात विकल्प उठतात आणि निष्ठा कमी होते. नामस्मरण सुरु झाले की विकल्पांना असह्य होते आणि आता आपली धडगत नाही या धास्तीने त्यांची चळवळ सुरु होते. मनुष्याला नामस्मरणापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न ते करतात. नामस्मरणाने विकल्प उठतात म्हणजे विकल्पांच्या मूळ ठिकाणापर्यंत नामस्मरणाची धग जाऊन पोहचली असे समजावे आणि जास्त आस्थेने नामस्मरणाचा निश्चय करावा. सतत नामस्मरणाने विकल्प कमी होतात. कोणतीही गोष्टी अभ्यासानेच साध्य होते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. विकल्प जाऊन भगवंताचे संकल्प उठू लागले की आपले काम निश्चित झालेच म्हणून समजावे ! आपण रस्त्याने चाललो की नको ती माणसे भेटायचीच पण आपण आपले नामस्मरण सोडू नये. विकल्पांनी आपले लक्ष ओढून घेतले तर नावडीने लक्ष द्यावे पण नामस्मरण सोडू नये. श्री स्वामी समर्थ मंत्राचे स्मरणच सर्व शंकांचे निरसन करते.
सर्व दुःखाला कारण देह बुद्धी नुसत्या नामस्मरणाने 'श्री स्वामी समर्थ, श्री स्वामी समर्थ' म्हणून स्वामी कसे भेटतील हा प्रश्न मनुष्य सहजच विचारतो. 'नोकरी, नोकरी' असा जप केल्याने नोकरी मिळेल का असा दाखलाही तो देतो. वास्तविक जो दाखला द्यायचा, ज्या बाबतीत द्यायचा त्याचे गुणधर्म सारखे असावे लागतात. नामस्मरणाचा शेवट परब्रम्हाच्या सन्निध जाण्यात आणि स्वतःच्या विस्मरणात होतो, म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, स्थुलांतून सुक्ष्माच्या पलीकडे जाणे हा 'नामस्मरणाचा परिणाम', तर सुक्ष्मातून स्थूलात जाणे हा 'नोकरीचा प्रकार'. 'श्री स्वामी समर्थ, श्री स्वामी समर्थ' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थुलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे. म्हणजेच अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेकवस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच नामस्मरणाने परब्रम्ह मिळणे निश्चित आहे. म्हणून अखंडपणे 'श्री स्वामी समर्थ' या मंत्राचे स्मरण करावे.
मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच : प्रेमाने परब्रम्ह श्री स्वामी समर्थांचे स्मरण करावे. नामस्मरण श्री स्वामींची गाठ घालून देईल कारण त्यांचे नाव व मंत्र दोन्ही एकच आहेत. चित्तात मात्र तळमळ पाहिजे. 'मी' पण टाकून श्री स्वामी महाराजांचे होऊन रहावे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

परम पुरुष अरु आतमा,
सन्धि निरन्तर योग ।
जड़ माया व्यापे नहीं, कभी न होय वियोग
।।१७।।(स्वर्वेद पंचम मण्डल प्रथम अध्याय) ०५/०१/१७
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
परब्रह्म आणि जीवात्म्याच्या निरंतर संबंधालाच योग म्हणतात, जिथे जड प्रकृतीचा प्रभाव पडत नाही तसेच दोहोंचा कधीही संबंध-विच्छेद होत नाही.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

## ज्याला प्रपंच नाही करता आला । त्याचा परमार्थ ढिला पडला ॥

आधुनिक केसरी

मातापिता यांचे न पाहावे दोष । हे सत्पुत्राचे लक्षण सत्य ॥ माता-पितरांचे समाधान । हेच सुपुत्राचे खरे लक्षण जाण ॥ त्यांचे राखून समाधान । जे करणे असेल ते करावे जाण ॥ आईचे अंतःकरण अत्यंत कोवळे असते । आपले दुःखीपणाने ते दुःखी होते । आपली आनंदी वृत्ति आईला आनंदी बनविते । म्हणून मुलांनी असावे नेहमी आनंदात । काहूर न माजू द्यावे चित्तात ॥ शब्दाने करावे त्यांचे समाधान । उत्तरी अपशब्दाचे न मानावे दुःख जाण ॥ नोकरी चाकरी उद्योग धंदा । पोटाकरिता करणे आहे सदा ॥ आपण पैका मिळवावा पुष्कळ । पण ते सुखाचे साधन न मानावे सकळ ॥ प्रपंचात नुकसान होईल असे काम करू नये । तसे शब्द बोलू नये ॥ आल्या अतिथा अन्न द्यावे । कोणास विन्मुख न पाठवावे ॥ निरुत्साही बनू नये । निराश वाटू देऊ नये ॥ अगदी व्यवहाराच्या मार्गाने जावे । त्यात रामाचे अधिष्ठान राखावे॥ ज्याला प्रपंच नाही करता आला । त्याचा परमार्थ ढिला पडला ॥



प्रपंचाची काळजी । हीच परमार्थाला वाळवी ॥ परमात्म्याचा आधार ज्याला । ठाव नसे काळजीला ॥ शेजार असता रामाचा । दुःखाची, काळजीची, काय वार्ता ? ॥ मी कोण हे जाणले ज्याने चित्ती । त्याला काळजी न राहे अशी होईल वृत्ति ॥ राम त्राता हा भाव ठेवावा चित्ती । निर्भयता होईल याच रीती ॥ ज्याने देह केला रामाला अर्पण । त्याला नाही काळजीचे कारण ॥ कर्ता राम हे आणता चित्ती । पापपुण्याची नाही त्याला भीति ॥ ज्याचा परमात्मा झाला सखा । त्याला नाही कोठे धोका ॥ ' कर्ता मी ' म्हणे आपण । हे सर्व दुःख-काळजीचे कारण ॥ झाले ते होऊन गेले । होणार ते चुकेना कोणाला भले ॥ म्हणून नाही करू काळजीला । राम साक्षी आहे त्याला ॥ जे जे काही माझे । ते ते जाणावे रामाचे ॥ राम त्यास सांभाळता । काळजीस कारण न उरले आता ॥ मुलाबाळांची न करावी काळजी । रामराय करावा राजी ॥ आपला प्रपंच हा रामाचा जाणून चित्तीं । काळजी चिंता करणे ही योग्य नाही रीति ॥ शक्य तो करावे नामस्मरण । आपली काळजी न करावी आपण ॥ रामाचा म्हणून प्रपंच केला । काळजीचे कारण उरत नाही आपल्याला ॥ भगवंत असता पाठीराखा । काळजीची काय कथा ? ॥ म्हणून, मुखाने नाम, चित्तांत राम, । त्याचे मनाला होईल आराम ॥ सतत ठेवावे एक चित्तीं । न सोडावा रघुपति ॥ सर्व सारांचे सार । एक भजावा रघुवीर ॥ नेमात नेम उत्तम जाण । रामावाचून न राहावे आपण ॥

**१७२. सर्व कर्ता राम । हा भरवसा ठेवावा ठाम । मग काळजीचे उरले नाही काम ॥**

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

1--वासना प्राणरूप आहे. 2--मन प्राणमय आहे. 3--वासना जाणीव प्रधान आहे तर वृत्ति जाणीव रूप आहे. 4--काही वेळा आपण माणसाच्या वृत्तिला विरोध करतो तर तेव्हा आपले मन शरण जाते तेव्हा नेणतेपणाची ओळख होते. 5--प्राणायाम केला की वृत्ति निरोध होतो. 6--भल्याबुर्याची जाणीव झाली की वृत्ति सुधारते पण वासना क्षीण होते, आणि वासना क्षीण झाली की मन शुध्द होते. 7--आता बघा हो मित्रांनो जाणीवेने आपल्याला चांगला मार्गदर्शक भेटला, म्हणजे जाणीव झाली म्हणून आपल्यातील रज,तम गुण त्याने दाखवून दिले. सम्यक दृष्टी दिली त्यामुळे काय झाले की मन*शुध्द झाले म्हणून जाणीव शुध्द झाली, जाणीव शुध्द झाली की ती मूळमायेमध्ये विलीन होते. शुध्द मन तुम्हाला खंबीर बनवते कोणत्याही संकटांना तोंड देण्यासाठी सक्षम बनवते. खरेखोट्याची जाणीव मनाला भिडते तेव्हा आपोआपच वाईट गोष्टी आपल्या हातुन होऊचं शकत नाही मन चंगा तो कटोती में गंगा ही म्हण प्रचलित झाली ती या अभ्यासामुळेचं ना ।।



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, २१ जून २०२४

adhunikkesari.com


# लोणंदच्या समस्यांप्रश्नी नागरिक आक्रमक

## बंदिस्त गटर व स्ट्रीट लाईट सुविधा होणेबाबत निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** बंदिस्त गटर व स्ट्रीट लाईट सुविधा पंजाब कॉलनी, झारेकरी वस्ती आणि परिसरात होणेबाबत लोणंद नगरपंचायतीला नागरिकांकडून निवेदन देण्यात आले. यावेळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी आक्रमक पवित्रा घेतला. तसेच यावेळी पंजाब कॉलनी आणि झारेकरी वस्तीतील महिलांचा मोठया संख्येने सहभाग होता. समस्या बाबतचे निवेदन लोणंद नगरपंचायतीचे मुख्याधिकारी दत्तात्रय गायकवाड यांना नागरीकांच्या वतीने देण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी यांनी याप्रश्नी सकारात्मकता दाखवत हा प्रश्न सोडविला जाईल.असे म्हटले. निवेदनतील समस्यांचे निवारण त्वरित केले जाईल, गटारांची कामे पालखी होताच मार्गी लागतील, असे आश्वासन सुद्धा मुख्याधिकारी दत्तात्रय गायकवाड यांनी दिले.



मुख्याधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात असे म्हटलेले आहे की,आम्ही लोणंद प्रभाग क्र.०२ मधील कायम रहिवाशी असून आमचे येथे पंजाब कॉलनी आणि झारेकरी वस्ती याठिकाणी सांडपाणी वाहून जाणेसाठी गटर व्यवस्था नसलेने रहिवास परिसरात सांडपाणी साठुन राहून घाणीचे साम्राज्य पसरत आहे.परिसरात दुर्गंधी पसरत असून रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून पाण्याची डबकी साचल्यामुळे डासांचा उपद्रव वाढलेला असून रोगराई निर्माण होण्याची शक्यता आहे. सध्या डेंग्यू सदृश्य आजार पसरत आहे.तसेच पंजाब कॉलनी अंतर्गत व झारेकरी वस्ती अंतर्गत स्ट्रीट लाईटची व्यवस्था नसलेने आम्हा येथील लोकांना रात्री-अपरात्री येणे-जाणेही मुश्किल झाले आहे. आम्हा येथील रहिवाश्यांची बंदिस्त गटर व स्ट्रीट लाईटची गेली १० वर्षापासूनची मागणी असून नागरी सुविधांच्या अभावामुळे आम्हा येथील परिसरातील रहिवाश्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.तरी लोणंद नगरपंचायत प्रभाग क्र.०२ मधील पंजाब कॉलनी, झारेकरी वस्ती आणि परिसरात बंदिस्त गटर व स्ट्रीट लाईट सुविधा मिळावी.अशी विनंती करण्यात आलेली आहे.

तसेच वेळेवर घंटागाडी येत नाही,पाण्याची वेळ अनियमित आहे.आदी प्रश्नांवर आधारित सुद्धा समस्या मांडण्यात आल्या.

विविध विकासकामे तसेच नागरी सुविधा बाबत नगरपंचायतीच्या वतीने वारंवार टाळाटाळ केली जात आहे.असे नागरिकांनी म्हटले.निवेदन देते वेळी अ‍ॅड.सर्फराज बागवान, हर्षवर्धन शेळके - पाटील डॉ.किशोर बुटीयानी, बाळकृष्ण भाटिया, शत्रुघ्न झारेकरी,गुलशन भाटिया, प्रभागातील नागरिक,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.लोणंद नगरपंचायतीवर प्रभाग क्र.२ च्या नागरिकांनी मोर्चा काढून एक वर्षे झाली तरी विकासकामे मार्गी लागली नाहीत,समस्या सोडवल्या जात नाहीत.असा आरोप खंडाळा तालुका राष्ट्रीय कॉँग्रेस अध्यक्ष अ‍ॅड.सर्फराज बागवान यांनी केला.

पिण्याचे पाणी सोडण्याची वेळ,पथदिवे लावणे,घंटागाडी नियोजन,स्वच्छता करतेवेळी लोणंद शहरातील मूलभूत समस्या सोडवत असताना कोणत्याही प्रभागासोबत दुजाभाव करु नका. असे सातारा जिल्हा भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा सरचिटणीस हर्षवर्धन शेळके-पाटील यांनी म्हटले.मुख्याधिकारी दत्तात्रय गायकवाड यांच्या कडे निवेदन देत असताना उपनगराध्यक्ष रविंद्र क्षीरसागर,नगरसेवक सागर शेळके व इतर ही उपस्थित होते.

# अनेक भागांत पावसाचा जोर वाढला

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मोसमी पावसाने राज्यात थोड्या कालावधीसाठी नाही तर तब्बल दोन आठवड्याहून अधिक काळ विश्रांती घेतली होती. मात्र, पावसाची ही विश्रांती आता संपली असून तो पुढे सरकला आहे. राज्यातील अनेक भागात पावसाचा जोर वाढला आहे. मुंबईतही पुन्हा पावसाने प्रवेश घेतला असून काही भागात दमदार पावसाने हजेरी लावली. यंदा रोहिणी नक्षत्र पूर्णपणे कोरडे गेले, पण हवामान खात्याने शेतकऱ्याच्या आशा पल्लवीत ठेवल्या. खात्याच्या अंदाजानुसार मृग नक्षत्रात दमदार पावसाचा अंदाज देण्यात आला. मात्र, या नक्षत्राचा प्रवास संपण्याच्या वाटेवर असतानाही दमदार पाऊस झालाच नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली. सुरुवातीच्या पावसावर आणि हवामान खात्याने दाखवलेल्या आशेमुळे काही शेतकऱ्यांनी पेरणी केली, पण पावसाने दिलेल्या हुलकावणीमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली. तर काही ठिकाणी पाऊसच नसल्याने पेरण्या देखील रखडल्या. सलग दोन आठवडे पावसाने दडी मारल्याने पेरणी करणारा आणि पेरणी न झालेला शेतकरी हतबल झाला आहे.  आभाळी वातावरणाने शेतकरीच नाही तर नागरिकांनाही पावसाचे वेध लागतात, पण पाऊस प्रत्येकवेळी पाठ फिरवत असल्याचे चित्र या दोन आठवड्यात तयार झाले होते. राज्यातील अनेक भागात मोसमी पावसाचा जोर वाढला आहे. राजधानी मुंबई ओलिचिंब झाली आहे. तर हवामान खात्याने आज, गुरुवारी राज्यातील अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा तर काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी कोसळतील, असा अंदाज व्यक्त केला आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज हवामान खात्याने दिला आहे.

# ओबीसी आंदोलनाला जळगाव जामोदमधील ओबीसींचे समर्थन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जामोद :** जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील वडीगोद्री या गावी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ओबीसी आंदोलन सुरू केले असून गेल्या सात दिवसापासून ते उपोषणाला बसलेले आहेत त्यांच्या समर्थनार्थ 19 जुलै रोजी जळगाव जामोद व संग्रामपूर तालुक्यातील सर्व ओबीसी बांधवांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना स्थानिक उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत निवेदन सादर करण्यात आले.

ओबीसी आरक्षण बचावासाठी उपोषण करते लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या आंदोलनाला समर्थन तसेच शासनाने ओबीसींच्या मागण्या तात्काळ मान्य करावे याबाबत महाराष्ट्र राज्य ओबीसी आरक्षण बचाव समितीच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण देण्यात येऊ नये, झालेल्या लाखोच्या अवैध नोंदी तात्काळ रद्द करण्यात याव्या व त्याची पडताळणी करावी, ओबीसींची जातीनिहाय जनगणना करावी, मराठ्यांचे सगे सोयरे बाबतचा निर्णय लागू करू नये, मराठ्यांना सरसकट ओबीसी आरक्षण लागू करू नये अशा मागण्यांचे निवेदन शासनाकडे देण्यात आले असून सदर मागणी तात्काळ मान्य करण्यात याव्या व ओबीसींना न्याय द्यावा, अन्यथा ओबीसी पेटून उठेल व अशा परिस्थितीत तीव्र आंदोलन झाल्यास त्याला संपूर्णपणे शासन जबाबदार राहील असा इशारा देखील देण्यात आला आहे. सदर निवेदनाची प्रतिलिपी ओबीसी विभागाचे माजी मंत्री आमदार डॉक्टर संजय कुटे यांना देण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र राज्य ओबीसी आरक्षण बचाव समितीचे अध्यक्ष ओ.पी. तायडे यांच्यासह राजीव घुटे, राजेश लहासे, विजय म्हसाळ,श्याम इंगळे, सुनील धनगर, अनिल भगत, प्रशांत बोपले, अनिल इंगळे,जयदेव वानखडे,प्रकाश तायडे, शिवरतन दाते अरुण वानखडे,नामदेव बगाडे,रमेश अकोटकर, दुर्गादास अकोटकार, शहादेव गोमासे,वसंत जाधव, प्राध्यापक विजय सातव, शरद गोमासे,सोपान गोंड, सुनील भगत, दिलीप बाभुळकर, गणेश व्यवहारे, शिरसोले, रमेश ताडे, मनोज वाघ, कल्पेश नारळकर आदींची उपस्थिती होती.




# राहुल गांधींची टीका

आधुनिक केसरी

राष्ट्रीय पात्रता-प्रवेश परिक्षेमध्ये देशभरात जो गोंधळ पाहायला मिळाला, त्यावरून आता NEET परिक्षा देणारे विद्यार्थी देशभरात रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. या विषयावर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेत केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली. पेपरफुटी प्रकरणामुळे देशातील विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. दिल्ली येथील काँग्रेस मुख्यालयात राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले की, पंतप्रधान मोदी रशिया-युक्रेन युद्ध थांबवू शकतात. पण काही कारणांमुळे ते भारतातील पेपरफुटी थांबवू शकत नाहीत. राहुल गांधी पुढे म्हणाले, भाजपाकडून शैक्षणिक क्षेत्र ताब्यात घेतल्यामुळेच पेपरफुटी प्रकरणे घडत आहेत. आतापर्यंत पेपरफुटीची प्रकरणे थांबण्याऐवजी ती वाढतच आहेत. भाजपाने शैक्षणि संस्थांवर आपल्या विचारांचे लोक नियुक्त केले आहेत. पेपरफुटीवर या लोकांकडून कार्यवाही होण्याची गरज होती, मात्र त्यांनी काहीच केले नाही. सुमार लोक शैक्षणिक संस्थांवर नेमल्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. या प्रकरणी आता चौकशी सुरू आहे. एक परीक्षा रद्द झाली आहे. पुढची परीक्षा होणार की नाही? याची कल्पना नाही. या पेपरफुटीसाठी जे जे लोक जबाबदार आहेत, त्यांना अटक करून कारवाई केली गेली पाहीजे, असेही राहुल गांधी म्हणाले. नरेंद्र मोदी नावाच्या संकल्पनेची गुजरात मॉडेलपासून सुरूवात झाली. हजारो कोटी रुपये खर्च करून मार्केटिंग करणे आणि सरकारी यंत्रणेचा वापर करून भीती निर्माण करणे, अशी ही संकल्पना होती. पण आता देशात कुणी मोदींना घाबरत नाही. जी ५६ इंचाची छाती होती, ती आता ३०-३२ वर आली आहे. याचा मानसिक परिणाम पंतप्रधान नरेंद्र मोदीवर होणार असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. मोदींची भीती नष्ट झाल्यामुळेच वाराणसीमध्ये त्यांच्या ताफ्यावर कुणीतरी चप्पल फेकली. याचा अर्थ मोदींची आता भीती राहिली नाही. देशातील विरोधकांनी मोदींच्या प्रतिमेला तडा दिला. त्यामुळे मोदींची भीती राहिली नाही. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा स्वभाव सर्वांना आवडणारा होता. अशा कठीण प्रसंगातून त्यांनी नक्कीच वाट काढली असती. पण नरेंद्र मोदींची शैली अशी आहे की, ते कुणाचे ऐकून घेत नाही. माझा मार्ग हाच सर्वोत्तम महामार्ग अशी त्यांची हेकेखोर वृत्ती असते. त्यामुळे येणाऱ्या दिवसांत त्यांच्यासमोरील अडचणी वाढणार आहेत, असे सुतोवाच राहुल गांधी यांनी केले.




राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

# 'त्या' महाविद्यालयांवर कार्यवाही का नको ?

आधुनिक केसरी

**देशाच्या शिक्षण क्षेत्रात गुणात्मक मुल्यांकन करण्यासाठी युजीसीच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर ज्याला नॅक मुल्यांकन म्हणुन स्वतंत्र एजन्सी काम करते. तीन वर्षाआड महाविद्यालयाने सामोरे जावुन मुल्यांकन करून घेणे महत्वाचे. असे असताना राज्यात पन्नास टक्के देखील महाविद्यालये स्वत:चं मुल्यांकन करून घेण्यासाठी पुढे येत नाहीत?त्याचं कारण कळत नसलं तरी केवळ आर्थिक लाभापोटी संस्था चालवायच्या आणि गुणवत्तेचे कोंबडं झाकुन ठेवायचं परिणामी काही उघडं पडेल म्हणुन तोंड लपवत बसायचं या भुमिकेत महाविद्यालय चालवणारे संस्थाचालकाची भुमिका दिसते.**

पण आता राज्य सरकारच्या उच्च शिक्षण विभागाने कठोर भुमिका घेताना असे महाविद्यालय जे नॅककडून मुल्यांकन करून घेत नाहीत त्यांच्यावर कठोर कारवाई करावी परिणामी विद्यापीठाकडून संलग्नता रद्द करावी आणि हे जर नाही केलं तर नविन शैक्षणिक धोरण कितीही कठोर परिवर्तनशील राबवायचं ठरवलं तरी अशा अव्यवस्थेमुळे अडथळे निर्माण झाल्याशिवाय रहाणार नाहीत. महाविद्यालयाचे ऑडीट करण्याचा उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून झालेला निर्णय कौतुकास्पद म्हणावा लागेल. पण हे करताना विद्यापीठ व्यवस्थापनाच्या दुर्लक्षित मनमानी कारभारावर गुणवत्तेच्या दृष्टीने अंकुश मात्र ठेवावाच लागेल.  सुसंस्कृत समाज निर्मिती नव्हे तर देशाच्या उभारणीत शिक्षण क्षेत्राची फार मोठी जबाबदारी महत्वाची वाटते. त्यामुळे व्यवस्था चालवणाऱ्यांनी या क्षेत्रात पारदर्शक गुणात्मक काम करणे महत्वाचे. वर्षानुवर्षे सत्ता चालवणाऱ्यांनी शिक्षण क्षेत्राला भ्रष्टाचाराचं कुरणच बनवलं. त्यामुळे विद्यापीठ असो किंवा संस्थाचालक असो गुणवत्तेच्या दृष्टीने चौकस आणि सखोल कारभाराचा अभाव प्रत्येक ठिकाणी दिसतो. संपुर्ण देशात महाविद्यालय अकरा हजार पेक्षा अधिक संख्येने आहेत असं म्हटलं तर चुकीचे ठरणार नाही. या क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर काम करणारी युजीसी नावाची एजन्सी असुन गुणवत्तेच्या दृष्टीने आणि भौतिक देखभालीचं काम महाविद्यालय स्तरावर त्यांच्याकडून केल्या जातं. गंमत बघा, आमचं मुल्यांकन करा अशा प्रकारची मागणी महाविद्यालयाकडून युजीसीला केली जाते. याचा अर्थ आम्ही गुणवत्ता आणि भौतिक सुविधेच्या दृष्टीने सक्षम आहोत का नाहीत?याची तुम्ही परीक्षा घ्या असा होवु शकतो. पण दुर्दैव यासाठी म्हणावे लागेल की देशात पन्नास टक्यापेक्षा अधिक संख्येने मुल्यांकन करण्यासाठी ना संस्थाचालक पुढे येतात ना महाविद्यालय पुढे येतात. प्रश्न हाच महाराष्ट्रात देखील गंभीर होवुन बसलेला आहे. कारण कधी काळी सत्ता चालवणाऱ्यांनी या क्षेत्राला भ्रष्टाचाराचं कुरण बनवलेलं असुन जेव्हा काही परिवर्तन आणि पारदर्शक कारभार करणारी व्यवस्था बदलत रहाते त्यावेळी मात्र सामान्य लोकांच्या अपेक्षा त्यांच्याकडून असतात. राज्यात भाजपचं सरकार आल्यानंतरच अशा अपेक्षा का? त्याचं उत्तर देखील समर्पक असुन हे बदल आणि गुणात्मक तत्वाचा स्विकार केवळ भाजप विचाराची मंडळी करू शकते हा अनुभव आता लोकांनासुद्धा वाटतो. मुळ विषयाला धरून चालायचं झालं तर शिंदे-फडणवीस-पवार सरकारने अर्थात राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने ज्याचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणुन काम करतात. त्यांनी गुणात्मक बदल स्विकारत असताना सर्व महाविद्यालयाचे शैक्षणिक प्रशासकिय



लेखापरीक्षण ऑडीट करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी समिती गठीत करण्यात आली असुन काही तज्ञ पॅनल तयार केले. ज्यामुळे महाविद्यालय चालवण्यावर अधिक नियंत्रण येवु शकते. खरं तर विद्यापीठ कायद्यामध्ये महाविद्यालयाचे दर तीन वर्षानी शैक्षणिक आणि प्रशासकिय लेखा परीक्षण करण्याची तरतुद करून ठेवलेली आहे. पण विद्यापीठ चालवणाऱ्या व्यवस्था याकडे पुर्णतः डोळेझाक करतात. वास्तविक पहाता विद्यापीठाच्या कुलगुरूवर सर्वस्वी जबाबदारी जाते पण त्यांच्याच भुमिकेत निष्क्रियता जेव्हा भरलेली असते तेव्हा वेगवेगळे उपक्रम घेण्यासाठी अभाव निर्माण होतो.कागदोपत्री मुल्यांकन करायचं आणि मग ग्रेड देवुन टाकायचे.मध्यंतरी एका विद्यापीठात यावर बराच खल झाला होता. एक गोष्ट खरी आहे की, शिक्षण क्षेत्र चालवणाऱ्यांच्या भुमिकेतच कमालीची गुणवत्ता आणि पारदर्शकता असणे महत्वाचे वाटते. मुल्यांकन का टाळतात? खरं तर महाविद्यालयाचं मुल्यांकन नॅककडून करून घेणं ही जबाबदारी संस्था चालकांची त्यानंतर संबंधित विभाग आणि सरकारची पण असते. मध्यंतरी एका महाविद्यालयाचं मुल्यांकन करण्यासाठी समिती आली होती. त्यातल्या एका वरिष्ठाने सांगितलं की देशात पन्नास टक्के मुल्यांकन करून घेण्यासाठी महाविद्यालय पुढे येत नाहीत. अत्यंत दुर्दैव असुन या प्रश्नावर राज्य आणि केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाने कठोर भुमिका घ्यायला हवी. जे महाविद्यालय नॅक मुल्यांकन करत नाहीत त्यांची मान्यता रद्द करणं यासाठी कठोर बदल करावे लागतील. पण मुल्यांकन का टाळतात? या प्रश्नाचा शोध जेव्हा घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा लक्षात आलेली गंभीर गोष्ट म्हणजे राज्यात बहुतेक शिक्षण संस्थाचालकाचे महाविद्यालय केवळ इमारतीच्या कागदावर चालतात, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांची भरती, त्यांचे पगार सर्व नियमित आणि वेळेवर पण महाविद्यालय बंद मग अशा महाविद्यालयाची मान्यता सरकार का काढून घेत नाही? त्यापेक्षा जिथे महाविद्यालय ते चालते का नाही? याची चौकशी आणि पहाणी करणे महत्वाचे. बाकी काही असलं तरी राज्याच्या उच्च तंत्र विभागाने महाविद्यालय तपासणीचा घेतलेला निर्णय येणाऱ्या काळात लाभदायक ठरेल. त्याची अंमलबजावणी कितपत योग्य पद्धतीने होते तो भाग वेगळा. पण एक गोष्ट खरी आहे की युजीसीकडून महाविद्यालयाचं नॅक मुल्यांकन करूनच घेतलं पाहिजे. त्यासाठी विद्यापीठाने कठोर पावले उचलणे महत्वाचे आणि जे महाविद्यालय पुढे येत नाहीत त्यांची विद्यापीठ संलग्नता रद्द करायला हवी हे तितकंच खरं. नॅक मुल्यांकन म्हणजे एखाद्या माणसाने चांगल्या रूग्णालयात जावुन आपल्या शरीराची सर्व तपासणी अर्थात ऑडीट करणं महत्वाचं यापेक्षा दुसरं उदाहरण इथे लागु पडतच नाही. कारण सर्वंकष तपासणी सदृढ शरीर तसंच नॅक म्हणावे लागेल. महाविद्यालय त्यातल्या सुविधा, वेगवेगळ्या विभागाची गुणवत्ता, समाजाचं दायित्व, विद्यार्थी घडवणं, मैदान, व्यायाम, संगीत, आरोग्य शिवाय लोक भावना त्या महाविद्यालयाच्या प्रती असणं. या साऱ्या गोष्टीचा सर्वंकष निरिक्षण म्हणजे नॅक मुल्यांकन होय आणि त्यात जर महाविद्यालय पास झाले तर मिळणाऱ्या ग्रेड आधारे राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या वेगवेगळ्या एजन्सीकडून महाविद्यालयाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी मिळु शकतो. मग त्या महाविद्यालयाचा सर्वांग विकास होण्यास मदत होते. अर्थात हे सारं शिक्षण संस्था चालकाच्या भुमिकेशी निगडित आहे. स्वतः शिक्षण संस्था चालकांनी देखील आपण चालवत असलेल्या शाळा, महाविद्यालयावर गुणात्मकदृष्ट्या विशेष लक्ष्य घातले. त्याचा फायदा निश्चित शिक्षण क्षेत्राच्या सर्वांग प्रगतीसाठी झाल्याशिवाय रहाणार नाही. पण संस्था चालकच जर उदासिन असतील तर अशा वेळी नाठाळाच्या माथी बसल्याशिवाय रहाणार नाही काठी.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# मतलब हा आवडीचा केंद्रबिंदू असतो

आधुनिक केसरी

**जीवनातील स्थिरता आणि अस्थिरता हि आपल्या आवडी निवडी भोवती फिरत असते आपली आवड निवड हि मतलबा भोवती फिरते आणि याच चक्रव्युहात आयुष्य फस्त.संसारातील बहुतांश नातेसंबंध बंध हे वरकरणी जरी घट्ट मजबूत दिसत असले तरी देखील अंतिमतः मतलब हाच आवडीचा केंद्रबिंदू असतो.विना मतलब आवड हि आध्यत्मिक जीवनात अथवा परमार्थात असते.संसार अथवा भौतिक जीवन म्हटलं की निस्वार्थ हा तुरळकच असतो. पण संसारात राहून विनामतलब आवड निर्माण होणं हे सात्विक लक्षणं असतं आणि जीवनात हेच लक्षणं अर्जित करण्याचं धेय्य असलं पाहिजे. सहजासहजी आपल्याला कोणा विषयी आवड निर्माण होईल हि परस्थिती अपवादात्मक असतो.**

शक्यतो बिना मतलब आवड हि निव्वळ दुर्लभ अथवा दुर्मिळ असते. क्षणभंगुर जीवनात कोणीही कोणाचा खासमखास प्रिय नसतो.वेळ काळ परस्थिती मतलब या मुळे प्रियत्व खासत्व निर्माण होत असत आणि ते टिकत देखिल मतलब आहे तोपर्यंतच जीवनात निर्माण होणारे सगळे स्नेह बंध हे शेवटी येऊन मतलबाच्या महासागरात मिळतात.जितका वेळ मतलब आहे तितकाच वेळ तो स्नेह जीवंत अथवा अस्तित्वात असतो.मतलब संपला स्नेह बंध संपला मग स्नेह बंधातील कोणतही पात्र असु द्या अभिनय तो पर्यंतच आहे जोपर्यंत मतलब जीवंत आहे.मतलब संपला आवड जिव्हाळा संपला हे वास्तव आहे.जिव्हाळा,आवड,गोडी हि सहजासहजी आपल्या मनात कोणाविषयी हि निर्माण होत नाही.हे वास्तव आहे मग संबंधित व्यक्ती परिचित असो अथवा अपरचित स्नेह बंधातील असो अथवा नसो आवड हि शेवटी मतलबावर येऊन स्थिर होते.परमार्थात निस्वार्थ निरपेक्ष भाव हाच आवडीचा निकष असतो.पण या उलट संसारात मात्र आवड हि मतलबा भोवती फिरत असते.आपण कोणाच्या आवडीचे अथवा आपल्या कोण आवडीचा याचा मुख्य निकष काय याचा विचार करून सुयोग्य पद्धतीने पाहिलं तर आपल्या आवडीनुसार मतलबा हाच केंद्रबिंदू निश्चित होतो.मानवी जीवनात स्नेह बंधाचा जन्म हा मतलबातुनच होत असतो.संसारीक जीवनातील आवडीचा संबंध हा खासकरून मतलबाशी निगडित असतो.हे अगदी त्रिकाल बाधित सत्य आहे पण हे कटु सत्य कोणीही सहजासहजी मान्य करणार नाही अथवा स्वीकारणार नाही.सत्य स्वीकारणं अथवा मान्य करणं हे मानवी स्वभावाच्या विपरीत असल्याने ते पचत नाही.पण सत्य जाणल तर आवड हि मतलबा भोवती फिरत असतेच.आवड म्हणजे आकर्षण गोडी जी नेहमीच मतलबा भोवती फिरत असते.वास्तविक पाहिलं तर आवड हि विना मतलब असली पाहिजे.विना मतलब आवड गोडी परमार्थात असते.संसारात मतबल हिच आवड असते. माणसांच महत्व हे मतलबानुसार ठरत असतं आपण कोणासाठी किती महत्वपूर्ण आहेत अथवा आपल्यासाठी कोण किती महत्वपूर्ण आहे हे मतलबानुसार ठरत असतं पण विना मतलब जर कोणाच्या लेखी आपल्या विषयी आवड असेल तर हिच खरी आणि निस्वार्थ आवड असते श्रद्धा आणि निष्ठा हि निरपेक्ष भाव ठेवून असली पाहिजे आणि हिच अस्था निरपेक्ष असते प्रमाणिक असते.निष्ठा हि मतलबा नुसार ठरते जसा मतलब तशी निष्ठा असते.पण लाभा शिवाय निष्ठा नसते.आपल्याला वरकरणी दिसतं तसं नसतं विना मतलब आवड हि दुर्लभ असते.अपवादात्मक परिस्थितीत विना मतलब आकर्षण आवड असते.संसार म्हटल कि मोह, माया,स्वार्थ,आलाच,जीवनात आपला कळत नकळत अनेकांशी संपर्क येत असते.आपले इतरांशी अथवा इतरांचे आपल्याशी निर्माण होणारे स्नेह बंध हे जेव्हा घनिष्ठ अथवा अंत्यंत जवळचे निर्माण होतात असतात ज्या वेळी आपण त्या स्नेही बंध आवडीच मुळ शोधतो त्या वेळी मतलब हाच मुख्य घटक आवडीच्या केंद्रस्थानी असतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंतांचा गुणगौरव सोहळा

## कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता 10 वी आणि 12 वी वर्गातील विद्यार्थ्यांचा सार्वजनिक बांधकाम बीड आणि अंबाजोगाई विभागाचे कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांच्या शुभहस्ते रोख रकमेसह सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात येणार आहे. या पुरस्कारास पात्र असलेल्या गुणवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पाल्यांनी नोंदणी करून पुरस्कार स्वीकारण्यासाठी आपल्या संपूर्ण परिवारासह उपस्थित रहावे असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.



बीड येथील स.मा. गर्गे भवन येथील वाचनालय सभागृहात रविवार दिनांक 23 जून रोजी सकाळी 11 वाजता वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता 10 वी आणि 12 वी वर्गामध्ये विशेष प्राविण्यासह प्राप्त झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. या पुरस्कारास पात्र असलेल्या वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता 10 वी आणि 12 वीत किमान 75 टक्के गुण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी 94 22 74 46 05 प्रतिष्ठानचे सचिव विकास स्वामी यांच्या व्हाट्सअप नंबर वर आपला मार्क्स मेमो, स्वतःचा पासपोर्ट फोटो, संपर्क नंबर, संपूर्ण पत्तासह 21 जून पर्यंत नोंदणी करावी.

सदरील पुरस्कार हा गुरुवर्य यांच्या पावन उपस्थिती मध्ये तसेच प्रशासनातील अधिकारी गौरीशंकर स्वामी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई आणि बीड यांच्या शुभहस्ते तसेच माध्यमातील प्रतिष्ठित पत्रकार यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे. नोंदणी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यां मधून सर्वोत्कृष्ट टक्केवारीनुसार प्रथम, द्वितीय तृतीय आणि उत्तेजनार्थ असे मिळालेल्या मार्क्स टक्केवारी वरून क्रमांक काढले जातील. या विद्यार्थ्यांना रोख बक्षीसासह सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात येईल. त्याचबरोबर 75 टक्के पेक्षा जास्त असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र देऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दिली जाईल. जगद्विवेक प्रतिष्ठानच्या संस्थापिका स्वर्गीय जगदेवी विवेक स्वामी यांच्या 72 व्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी वीरशैव लिंगायत समाजातील विद्यार्थ्यांना गौरांकित करण्यात येणार आहे. यासाठी पात्र विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी वरील व्हाट्सअप नंबर वर संपर्क करून नोंदणी करावी असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने सचिव विकास स्वामी, अध्यक्ष वैभव स्वामी, विश्वस्त वैशाली अशोक पडोळे, रूपाली श्रीकांत स्वामी यासह समस्त स्वामी येळंबकर सदस्य यांनी केले आहे.

पत्रकारांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार प्रिंट मीडिया इलेक्ट्रॉनिक मीडिया सोशल मीडिया अंतर्गत पत्रकारांसह या क्षेत्रात विविध विभागांमध्ये काम करणाऱ्यांच्या ज्या पाल्याने 80 टक्के पेक्षा अधिक गुण घेतले असतील अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा देखील विशेष सन्मान या सोहळ्यामध्ये करण्यात येणार आहे. जे विद्यार्थी इयत्ता 10 वी आणि 12 वी परीक्षेत 80 टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन विशेष प्राविण्यात उत्तीर्ण झालेले आहेत.अशा पत्रकारांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. अशा गुणवंत विद्यार्थ्यांनी 98 22 62 85 21 या व्हाट्सअप नंबर वर मार्क्स मेमो, आपला मोबाईल नंबर, संपूर्ण पत्ता, पासपोर्ट फोटो पाठवून 21 जून पर्यंत नोंदणी करावी. असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष वैभव स्वामी यांनी केले आहे.



# पत्नी पीडित पुरुष आश्रमात पिंपळ पौर्णिमा साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** कौटुंबिक समस्या ग्रस्त पत्नी पिडीत पुरुष आश्रम करोडी छ.संभाजीनगर येथे वटसावित्री पौर्णिमेच्या पूर्व संध्येला आख्ख्या पद्धतीनेच पिंपळ पौर्णिमा साजरी करण्यात आली. ज्याप्रमाणे महिला ह्या वटसावित्री पौर्णिमा साजरी करून वर्षानुवर्षा पासून वट वृक्षाची पूजा करतात व अख्याइका प्रमाणे वट वृक्षास सात फेरे मारून सात जन्मासाठी हाच पती मिळावा यासाठी पूजा अर्चा करतात. परंतु दुर्दैवाची गोष्ठ कि ज्या पुरुषांच्या बायका त्याना भांडतात, त्यांच्यावर केसेस चा मारतात व त्यांचे ह्याच जन्मी जगणे अशक्य करतात, अश्या बायका देखील वट सावित्रीची पूजा करतात. वट सावित्री पौर्णिमा साजरी करून त्यांना आणखी सात जन्म त्यांच्या ताब्यात घेण्याची मागणी करतात. व अश्या भांडखोर पत्नीसोबत पत्नी पिडीत राहू शकत नाही, म्हणून पत्नी पिडीत पुरुष आश्रम करोडी छ संभाजी नगर येथे मागील सहा वर्ष्यापासून ''पिंपळ पौर्णिमा'' साजरी करून पिंपळाला साकडे घातले जाते.कि उद्या ज्यांच्या पत्नीने पतीला त्रास देऊन जगणे मुश्कील केले अश्या पत्नी पीडितांच्या बायका उद्या येऊन वट वृक्षाला खोटे नाटे बोलून साकडे घालतील तर त्यांचे ऐकू नका व अश्या पत्नी पीडितांची त्यांच्या पत्नी पासून सुटका व्हावी अशी याचना केली जाते. दिवसेंदिवस पुरुशांवरील अन्याय अत्याचारात वाढ होत चालली आहे ,महिला अबला होत्या त्यावेळी महिलांच्या सबलीकरणासाठी वेग वेगळे कायदे बनले गेले ,परंतु सदर कायदे बनवताने पुरुषांवर अन्याय होऊन पुरुष ''अबला'' होतील याचा विचारच न केल्याने आज खर्या अर्थाने पुरुष हतबल होऊन ,पुरुष ''अबला'' झाला आहे .त्यामुळे पुरुष सबलीकरण करण्यासाठी एकतर्फी कायदे रद्द होऊन पुरुषांना देखील कायद्याचे संरक्षण मिळणे गरजेचे आहे.

एक पुरुष ज्या वेळेस लग्न करतो तो फार मोठ्या अश्या उराशी बाळगतो व मोठ्या उत्सुकतेने लग्न करतो, परंतु त्याला हे माहित नसते कि त्याच्या स्वप्नाचे लग्न होताच तुकडे तुकडे होणार आहे. बहुतांश बायका ह्या लग्न होताच पतीचा तिटकारा करायला सुरुवात करतात व या न त्या कारणावरून पती सोबत भांडण तंटा करतात. आज काल बहुतांश बायका ह्या आपल्या पतीचा केवळ बुजगावण्या गत वापर करतात,केवळ लग्नाचा शिक्का मारला कि नंतर त्यांना नवरा नको परंतु त्यांची संपत्ती पैसा हेच पाहिजे असते. पत्नी केवळ आपल्या पतीवरच केस दाखल करत नाही तर त्याच्या संपूर्ण कुटुंबावर केसेस चा मारा करून सर्व कुटुंब वूध्वस्त करते. अश्या वेळी पती हतबल होतो,त्यास समाजास सांगण्यास लाज वाटते लोक लाजेने तो अर्धमेला होतो ,व त्रास जेव्हा असह्य होतो त्याचा काम धंदा असल्यास तो चालल्या जातो व अश्या परिस्थितीत तो पोलिसात तसेच न्यायालयात दाद मागण्यास जातो तेव्हा त्यास दाद मिळत नाही, पोलीस मदत करत नाही व पोलिसात मदत मिळाली नाही तर तो मोठ्या आशेने न्यायालयात धाव घेतो परंतु न्यायालयात देखील पिडीतांच्या पदरात निराशा पडते. एकदा कि पत्नीला आपल्या पती कडून पोटगी मिळण्यास सुरुवात झाली कि जन्म भर त्याची तिच्या तावडीतून सुटका होत नाही. पत्नी आपल्या पतीवर एक नाही तर अनेक जसे ४९८ अ ,डोमेस्टिक व्हायलन्स ,सी आर पी सी १२५ ,३०७ आय पी सी अश्या अनेक केसेसचा मारा करते . व अश्या वेळी त्यांच्यावर केसेसचा भडिमार झाल्यास तो आयुशातून उध्वस्त होतो. बहुतांशवेळा पैस्या अभावी जेल मध्ये देखील जातो.त्यातून सुटलाच तर शेवटी आत्महत्या करण्याचा मार्ग अवलंबत असताने दिसत आहे. न्याशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो ( N.C.R.B.) च्या नुसार आपण बघितले तर जवळ जवळ ३२.२ टक्के विवाहित पुरुषांनी वैवाहिक जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत तर त्याच्या तुलनेत महिला आत्महत्या ह्या केवळ ४.८ टक्के इतक्या आहेत. महिलांचे आत्महत्यांचे दर कमी आहेत हि बाब वाखाणण्या लायक आहे अशीच पुरुषांच्या बाबतीत देखील व्हावे व पुरुषांना देखील न्याय मिळावा. ह्या एकतर्फी कायद्यामुळे व समाजाच्या एकतर्फी धारणे मुळे पुरुष खचून जाऊन त्याची काम करण्याची क्षमता कमी होते व परिणामी देशाचे दर डोई उत्पन्न देखील घटत चालले आहे.तसेच अश्या अघोरी प्रकाराने आपली पवित्र विवाह पद्धत देखील धोक्यात येऊन येणारी पिढी देखील धोक्यात आहे. म्हणून पुरुषाचा कुणी तरी कैवारी व्हावा ,पुरुषांचे म्हणणे देखील कुणी आयकून घ्यावे त्यासाठी पत्नी पिडीत पुरुष आश्रम अतोनात प्रयत्न करत आहे पत्नी पीडितांच्या प्रमुख मागण्या अश्या आहे कि ,- पुरुषांसाठी स्वतंत्र पुरुष आयोग बनवावा एकतर्फी कायद्यावर बंदी आणावी, प्रत्तेक पोलीस ठाण्यात पुरुष दक्षता समिती स्थापन करावी, जिल्हा स्तरावर पुरुष तक्रार निवारण केंद्र देखील स्थापन करावे, कौटुंबिक वाद माननीय न्यायालयात गेल्यास एका वर्षाच्या आत निकाली काढावे. अश्या बहुतांश मागण्या आहे परंतु कुणी आयकून घ्यायला तयार नाही म्हनुन ह्या पिंपळास साकडे घालून आश्रमाच्या वतीने पिंपळाची मनोभावे पूजा करून त्यांच्या कडे पीडितांचे गाऱ्हाणे मांडले, ''कि आता देव तरी आमचे म्हणणे आयकेल'' व ह्या दुष्ठ बायकांच्या तावडीतून पत्नी पीडितांची सुटका करेल यासाठी आज रोजी पत्नी पिडीत पुरुष आश्रमात पिंपळ पौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष एड. भारत फुलारे, उपाध्यक्ष सुरेश फुलारे, सचिव चरणसिंग गुसिंगे, सोमनाथ मनाळ, एकनाथ राठोड, भाऊसाहेब साळुंके, प्रवीण कांबळे, भिक्कन चंदन, श्रीराम तांगडे, संजय भांड तसेच इतर मोठ्या संखेने उपस्थित होते.

# प्रा. लक्ष्मण हाकेंच्या आईला अश्रू अनावर

आधुनिक केसरी न्यूज

**वडीगोद्री :** ओबीसी बांधवांच्या लढ्यासाठी वडीगोद्री या ठिकाणी प्रा. लक्ष्मण हाकेंचे उपोषण सुरु आहे. अशात त्यांच्या घरी चार दिवसांपासून चूल पेटलेली नाही. लक्ष्मण हाकेंच्या आईला आणि वडिलांना अश्रू अनावर झाले आहेत. आईची प्रकृती बरी नाही त्यामुळे उपोषण स्थळी तू येऊ नकोस असा निरोप लक्ष्मण हाके यांनी पाठवला आहे. मात्र मुलाच्या पोटात अन्न नाही आम्हाला अन्न गोड कसं लागेल? असा प्रश्न लक्ष्मण हाकेंच्या आईने विचारला आहे. त्यांच्या डोळ्यांमध्ये हे बोलत असताना पाणी आले होत. आमचे लेकरु उपोषण करत आहे, आमचा जीव बुडून गेलाय. आम्ही काय करावे? बरा आहे का विचारले की बरा आहे म्हणतोय. निजूनच आहे फार काही बोलत नाही. आम्हाला दिसते की सगळे. आम्हाला अन्न गोड लागणार आहे का? त्याच्या पोटात पाणी नाही, अन्न नाही. आमच्या मुलाची सरकारने लवकर दखल घ्यावी ही आमची मागणी आहे. असे लक्ष्मण हाकेंच्या आईने म्हटले आहे. मराठ्यांना आरक्षण आम्ही काही नाही म्हणत नाही. पण ओबीसींना आरक्षण द्यायला पाहिजे. त्याच्या तब्बेतीसाठी आमचा जीव उडून गेला आहे. तो काय मागणी करतोय ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्य करावी असंही त्यांच्या आईने म्हटले आहे. आमचा लक्ष्मण उपाशी आहे. मलाही आता बरं वाटत नाही. बोलायलाही सुचत नाही. का लक्ष देत नाही माझ्या मुलाकडे? शासनाने दखल घेऊन लक्ष द्यायला पाहिजे. आम्हाला न्याय मिळाला पाहिजे असे लक्ष्मण हाकेंच्या वडिलांनी म्हटले आहे. एक एकर जमिनीवर आपली उपजीविका करणाऱ्या हाके यांचे वडील शेळ्या मेंढ्या राखायचे काम करतात. त्यांनाही मुलाची अवस्था पाहून चिंता वाटत असून तो समाजासाठी लढत असताना सरकार का लक्ष देत नाही असा सवाल त्यांनी केला. आपल्या मुलांच्या चिंतेत हाके कुटुंबीय असून त्यांच्या पाठीशी आता राज्यभरातील ओबीसी समाज उभा राहत असल्याचे दिसत आहे. गुरूवारी जुजारपुर गाव कडकडीत बंद करून गावात लाक्षणिक उपोषण सुरू करण्यात आले आहे. मराठा समाजाप्रमाणे सरकारने आपल्या मुलाच्या उपोषणाची दखल घ्यावी, अशी आर्त हाक लक्ष्मण हाके यांच्या आई वडिलांची आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या आंदोलनाचा आजचा आठवा दिवस आहे. लक्ष्मण हाके यांची प्रकृती उपोषणामुळे खालावली आहे. उच्च रक्तदाबामुळे त्यांना हृदयविकाराचा धोका उद्‌भवू शकतो अशी भीती व्यक्त केली आहे. त्यामुळे त्यांना उपचार घेण्याची गरज असल्याचे मत डॉक्टरांनी व्यक्त केले.

# जपानच्या बुलेट ट्रेनमध्ये 'आम्ही अधिकारी झालो' पुस्तक प्रकाशित

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** एरवी पुस्तक प्रकाशनाचे कार्यक्रम एखाद्या हॉल मध्ये किंवा एखाद्या कार्यक्रमा दरम्यान होतात, हे आपण नेहमीच वाचत आला असाल. पण नुकतेच “आम्ही अधिकारी झालो” या पुस्तकाचे प्रकाशन जपानच्या जगप्रसिध्द बुलेट ट्रेनमध्ये झाले! असे या बुलेट ट्रेनमध्ये प्रकाशन होणारे हे बहुधा जगातील पहिलेच पुस्तक असावे. या पुस्तकाचे प्रकाशन, पुस्तकाचे लेखक संपादक देवेंद्र भुजबळ, एमटीएनएलच्या निवृत्त उपव्यवस्थापक तथा कवयित्री पौर्णिमा शेंडे, नागरिक प्रतिनिधी जसविंदर सिंग, युवा प्रतिनिधी शिवम खन्ना, टूर गाईड कुमारी लू विन आणि पुस्तकाचे प्रकाशन करणाऱ्या न्युज स्टोरी टुडे पब्लिकेशनच्या प्रकाशिका अलका भुजबळ यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना भुजबळ म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशस्वी झालेल्या आणि पुढे कार्यक्षम, लोकाभिमुख सेवा बजावित असलेल्या 51 अधिकाऱ्यांच्या यश कथा या पुस्तकात आहेत. महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांना नुकतेच हे पुस्तक भेट दिले असता त्यांनी, हे पुस्तक युवकांना नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असे कौतुक केल्याचे सांगून प्रकाशनापूर्वीच पुस्तकाची पहिली आवृत्ती संपली अशीही माहिती भुजबळ यांनी दिली. नागरिक प्रतिनिधी म्हणून बोलताना गुरविंदर सिंग यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली की, सरकारी अधिकारी, कर्मचारी यांना नागरिकांच्या करातून पगार मिळतो याचे भान ठेवून त्यांनी स्वच्छ, कार्यक्षम, लोकाभिमुख सेवा बजावून सौजण्यपूर्ण वागणूक दिली पाहिजे. युवा प्रतिनिधी शिवम खन्ना याने सांगितले की, जशा पालकांच्या मुलांकडून अपेक्षा असतात तशाच मुलांच्या पालकांकडून काय अपेक्षा आहेत? हे त्यांनी समजून घेतले पाहिजे. विशेषतः करिअरच्या बाबतीत मुलांची आवड निवड, कल ओळखून त्यांना पूर्ण पाठिंबा दिला पाहिजे. आजचा युवक हा आजचा युवक आहे, तो 25 वर्षांपूर्वीच्या युवक नसून आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात केलेला आहे, हे पालकांनी लक्षात घेतले पाहिजे.

पौर्णिमा शेंडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, मी एमटीएनएल मध्ये टेलिफोन ऑपरेटर म्हणून नोकरीस लागले. पुढे लग्न होऊन दोन मुलं झाल्यावर सासरच्या मंडळींनी दिलेल्या पाठिंब्यामुळे आणि विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षांची पूर्व तयारी चांगली केल्याने अधिकारी होऊ शकले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अलका भुजबळ यांनी बहारदारपणे केले. तर कार्यक्रमाचे चित्रिकरण राखी देढीया यांनी केले. या कार्यक्रमास उपस्थित सर्व सहप्रवासी यांनी या अभिनव पुस्तक प्रकाशनास भरभरुन प्रतिसाद दिला.



# जागतिक योग दिन : समृद्ध जीवनाची गुरुकिल्ली

आधुनिक केसरी

**आज जागतिक योग दिनामुळे सर्व शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी घोषणा देत होते. निरोगी तन आणि शांत मनाची गुरुकिल्ली म्हणजे योग. नियमित करा योग, आयुष्यभर दूर ठेवा रोग. योग आहे आरोग्याची क्रांती, तुमच्या आयुष्यात आणेल सुख आणि शांती. यामुळे सर्वत्र योगमय वातावरण तयार झाले. 21 जून म्हणजे प्रकाश, स्पष्टता आणि प्रबोधन यांचा त्रिवेणी संगम होय. ध्यान हा योगाचा अविभाज्य भाग आहे. योग म्हणजे व्यायाम नाही तर स्वतःशी जगाशी आणि निसर्गशी एकरुपतेची भावना शोधणे होय.आरोग्य ही सर्वात मोठी भेट आहे. समाधान सर्वात मोठी संपत्ती असून ते केवळ योगानेच मिळते. योगासने करण्यासाठी प्रांतः काल महत्त्वाचा असतो. अनशा पोटी योग करणे अतिशय चांगले असते. योग करताना सैल कपडे घालावेत. स्त्रियांनी योग करण्यास काहीच हरकत नाही. असे वेगवेगळ्या ठिकाणी माहिती दिली जात होती. लोकांमध्ये योग दिनाबद्दल जागृती पसरण्यासाठी हा दिन मोठ्या उत्साहाने साजरा केला जात आहे.**




प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

**आज धकाधकीच्या जीवनामध्ये कोणालाच स्वतःसाठी वेळ देता येत नाही, जो तो सारखा पळत आहे . त्यामुळे ब-याच जणांचे शरीर तंदुरुस्त राहिले नाही. बैठे काम केल्यामुळे पोट पुढे आले आहे. तसेच खाली मान घालून मोबाईलवर जास्त वेळ दिल्यामुळे सुद्धा अनेक जण दुर्धर व्याधींनी ग्रस्त झाले आहेत. त्यामुळे योग करणे आज सर्वांसाठी अतिशय किफायतशीर व उपयुक्त आहे. त्यासाठीच हा लेखन प्रपंच.....**सांघिक खेळामुळे नेतृत्वगुणाचा विकास होतो.खेळामुळे मनोधैर्य वाढते सर्वांशी आपलेपणा येतो.असे आपण म्हणतो. सध्या खेळासाठी शाळेला मैदाने अतिशय कमी झालेली आहेत.

त्यामुळे विद्यार्थ्यांचे शरीर सुडौल बनत आहेत.आणि विद्यार्थी आळशी, कंटाळ खोर होत चालले आहेत. घरामध्ये बसून कॅरम बोर्ड वर वेळ घालत आहेत. आळस हा माणसाचा शत्रू आहे, अशी आळशी बालके देशाचं संरक्षण करणार काय? मिल्खा सिंगा सारखे धावणार काय त्यामुळे योग करून आपले शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी योगासनाची आज सर्वांनाच गरज आहे. त्यासाठी योग करा आणि निरोगी रहा. हा संदेश या लेखातून सर्वांना द्यावयाचा आहे.

योग हा शब्द संस्कृत भाषेतील 'युज् या शब्दापासून बनलेला आहे.ज्याचा अर्थ आत्म्याचे परमात्म्यात विलीन होणे.योगामध्ये ज्ञानयोग,भक्तियोग, कर्मयोग,राजयोग आहेत, ज्यांची आठ अंगामध्ये विभागणी केलेली आहे. त्यालाच अष्टांग योग म्हणतात. महाभारतात आणि भगवद्गीतेच्या फार पूर्वी 20 पेक्षा जास्त उपनिषेदामध्ये सर्वोच्च चेतनेसोबत मनाचे मिलन होणे म्हणजे योग होय.महर्षी पतंजली यांनी योग सूत्राची संपूर्ण माहिती सांगितली आहे. जैन धर्मातील पाच प्रतिज्ञा आणि बौद्ध धर्मातील योगाचाराची बीजे पतंजली योगसूत्रामध्ये आहेत. योगात अष्टांग मार्ग सांगितलेले आहेत. यम,नियमन आसन,प्रणायाम, प्रत्याहार हे बहिरंग आहेत.तर ध्यान, धारणा आणि समाधी हे अंतरंग म्हणून ओळखले जातात. योग म्हणजे बुद्धी, मन, भावना आणि संकल्प यांचे नियमन होय. त्यासाठी योग व्यक्तीला अतिशय महत्त्वाचा आहे आत्मशक्ती, विश्रांती, तृप्त झोप,पूर्ण अनुभवजन्य विश्वास याची जननी म्हणजेच योग होय. असे योगशास्त्रात सांगितले जाते. योग केल्याने मन शांत राहते, डोक्यातील त्रास देणारे विचार कमी होतात, साधुसंत, महंत, पंत यांना ज्या रिध्दीसिद्धी प्राप्त झालेल्या आहेत. त्या फक्त योगामुळेच आहेत.असे म्हटले जाते. भारतीय संस्कृतीत ऋग्वेदात योगाचा उल्लेख आलेला आहे. योग हे शास्त्र आहे. शरीर मन आणि आत्मा एकत्रित रित्या संतुलन साधण्याचे निरोगी आणि प्रसन्न ठेवण्याचे कार्य करते. योग ही आपल्या देशाची प्राचीन परंपरा आहे. योग साधना केल्याने मन तंदुरुस्त राहते.आसने, प्रणायाम आणि ध्यानधारणा या गोष्टी उत्तम आरोग्य राखायला उपयोगी पडतात. सूर्यनमस्कार.कपालभारती या योगिक क्रियांनी मनुष्याचे वजन कमी होण्यास मदत होते त्यामुळे 27 सप्टेंबर 2014 मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेने 21 जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून मान्यता दिली. त्यामुळे हा दिन जगभर साजरा केला जातो. तत्कालीन पंतप्रधान मा. नरेंद्र दामोदर मोदी यांनी 27 सप्टेंबर 2014 पासून 21 जून हा जागतिक योग दिन म्हणून घोषित केले, तो प्रत्यक्ष 21 जून 2015 पासून साजरा केला जात आहे.193 देशापैकी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या यादीतील 175 देशांनी या प्रस्तावाला तात्काळ मान्यता दिली. स्वतः पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीं यांनी भारताची राजधानी दिल्ली येथे राजपथावरील कार्यक्रमात सहभागी होऊन योगासने केले. त्यामुळे हा दिन आपण संपूर्ण जगभर शाळा महाविद्यालया तून तसेच वेगवेगळ्या प्रतिष्ठानकडून सर्व शासकीय निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेचे सर्व कार्यालयात साजरा करत आहेत. स्वतःला बदला, जग बदलेल. प्रत्येक दिवशी योग, आनंददायी ठरेल ! निरोगी आयुष्यासाठी योगासने अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात .त्यामुळे मधुमेह, बद्धकाष्टता यासारखे आजार कमी होताना दिसतात. योग हा स्नायूसाठी अतिशय चांगला व्यायाम आहे. तसेच शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या वरदान आहे. मनावरील ताण कमी होण्यासाठी योग अतिशय हितकारक आहे. पचन क्रिया ही चांगली होते. मन निरोगी राहते. अनेक आजारापासून मानवाला मुक्ती मिळते.



त्यामुळे तो ताजातवाना दिसतो.योगाद्वारे शरीरातील चरबी कमी होते.नेहमी योग केल्यामुळे तुमच्या शरीरातील साखरेची पातळी नियंत्रित राहते व खराब कोलेस्ट्रॉल ही कमी होतात.

स्नायू मजबूत होऊन शरीर तंदुरुस्त होते. म्हणूनच योगाला जगातील 175 देशांनी मान्यता दिली आहे. जगातील सर्व देशातील लोकांनी आपआपल्या तील सर्व मतभेद,भेदाभेद, उच्चनीचिता बाजूला सारून आपण सर्वजण एक आहोत या उद्देशाने सामूहिक रित्या 21 जून योग दिन साजरा करावा हाच मुख्य हेतू या मागचा आहे. म्हणून सन 2015 ला योगा फॉर हार्मनी ॲड पीस, 2016 मध्ये कनेक्ट द युथ , 2017 मध्ये आरोग्यासाठी योग,2018 - शांतते साठी योग 2019- ह्दयासाठी योग, 2020 -कौटुंबिक योग 2021- कल्याणकारी योग, 2022 मानवतेसाठी योग 2023 वसुधैव कुंटूबकम् आणि 2024 मध्ये महिला सशक्तीकरण असे दरवर्षी वेगवेगळ्या थीम्स वापरून योग दिन अतिशय आनंदाने जगभर साजरा केला जात आहे. योगाभ्यासावरील अनेक ग्रंथ सर्वत्र उपलब्ध झालेले आहेत. त्याचे वाचन करून योगाची शास्त्रशुद्ध माहिती आपण करून घ्यावी. सध्याची पिढी सुडौल होत आहे. व्यायाम हा प्रकार अतिशय कमी झाला आहे. त्यामुळे विद्यार्थी स्थूल होत आहेत. त्यासाठी योग ही या काळात संजीवनी ठरणारी बाब आहे. म्हणून योग करा, निरोगी रहा अनेक योग गुरु आहेत ते योगाच्या माध्यमातून अनेक लोकांना योगाचे धडे देऊन त्यांना आजारा पासून दूर ठेवत आहेत. दररोज सकाळी सकाळी उठून योगासने केल्यास शरीराला ताण मिळून शरीरात असणारे छोटे मोठे सर्व आजार, रोग नाहीसे होतात. त्यासाठी ताडासन, कोणासन, सुखासन, वज्रासन, अधोमुख श्वानासन, मंडूकासन,भुजंगासन,पाद हस्तासन असे वेगवेगळे प्रकार केल्यास शरीर सुदृढ व निरोगी राहते.

वरील सर्व आसने शास्त्रशुद्ध पद्धतीने केल्यास प्रतिकारशक्ती वाढते. मानसिक त्रासापासून सुटका मिळते. चिडचिडेपणा होत नाही. वयापेक्षा अधिक तरुण दिसण्यासाठी ही योग फायदेशीर आहे. चेहऱ्यावरील सुरकुत्या नाहीशा होतात. अनिद्रा होत नाही .म्हणून जास्तीत जास्त आपण दररोज योगासने करावे. जसे सूर्य, चंद्र, तारे आपले नियोजित कार्य दररोज करतात,त्याच प्रमाणे योग आपण डोळ्यासमोर ठेवला तर जीवन हे आनंददायी व सुखकारक जगता येईल,तसेच 21 जून हा उत्तर गोलार्धात सर्वात मोठा दिवस आहे. या दिवसाला खगोलशास्त्रात समर सॉलस्टाईस (SUMMER SOLSTICE) असे म्हणतात. आज पासून दक्षिणायनाला प्रारंभ होतो.

21 जून हा दिवस सर्वात मोठा व रात्र लहान असणारा आहे. आज 13 तास 14 मिनिंटाचा दिवस व रात्र 10 तास 46 मिनिंटाची आहे .असे ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ डॉ. दा.कृ सोमण यांनी सांगितले आहे. जागतिक योग दिनाच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा.



# फुलंब्री येथे डॉ. कल्याण काळे यांचा तालुका प्रमुख दिलीप मचे यांनी केला जाहीर सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे जालना लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय सर्वांचे आवडते कट्टर कडवट निष्ठावंत महाविकास आघाडीचे खासदार डॉ कल्याण काळे यांच्या फुलंब्री तालुका येथे, भव्य नागरी सत्कार करण्यात आला त्यावेळी सोयगाव शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे पक्षांचे तालुका प्रमुख दिलीप भाऊ मचे जोगेश्वरी हार्डवेअर चे उद्योग पती म्हणून ओळख असणारे जंरडी येथील सूर्यभान गवळी यांच्या भव्य जाहीर सत्कार करण्यात आला. जय शिवराय जय महाराष्ट्र खासदार डॉ. कल्याण काळे यांचा फुलंब्रीत जाहीर सत्कार जालना लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे नव निर्वाचित खासदार म्हणून डॉ. कल्याण काळे यांची बहुमतेने निवड झाल्यानंतर प्रथमच जाहिर सत्कार आयोजित करण्यात आला होता. सत्काराला उत्तर देतांना त्यानी आभार व्यक्त करतांना सोयगाव सिल्लोडचे विधान सभेचे विशेष आभार मानतो. कारण ते त्यांचे घर होते फुलंब्री तर माझे घरच असल्याने मला शाश्वती होती, असे मत खा. डॉ. कल्याण काळे यांनी सत्काराला उत्तर देतांना व्यक्त केले जालना लोकसभा मतदार संघाचे विजयी खासदार डॉ. कल्याण काळे यांचे फुलंब्री शहरात जगी स्वागत सोयगाव तालुका प्रमुख दिलीप मचे, जरंडी येथील सुर्यभान गवळी व सोयगाव चे शिवसैनिक पदाधिकारी यांच्या स्वागत करण्यात आले. याप्रसंगी भव्य रॅली काढण्यात आली होती. भव्य नागरी सत्कार यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृहात संपन्न झाला. या वेळी नामदेव पवार, विलास औताडे, राजेंद्र पाथरीकर, संदीप बोरसे, काशिनाथ जाधव वरूण पाथरीकर राजेंद्र ठोंबरे अजगर पटेल मंगला कापरे, लहुजी शेवाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. जालना लोकसभेच्या खासदार पदी डॉ. कल्याण काळे बहुमताने निवडून आल्याबद्दल तालुक्याच्या वतीने सोमवार (१७ जुन) रोजी फुलंब्री येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. सत्काराच्या निमित्ताने येथील महात्मा फुले चौक ते मार्केट कमिटी पर्यंत भव्य रॅली काढण्यात आली होती या रॅली दरम्यान महाविकास आघाडीच्या वतीने डिजेच्या तालावर नाचून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

# पहूर येथील साखळी उपोषण मागे

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** पेठ येथील वाघुर नदीच्या तीरावर श्री क्षेत्र केवडेश्वर महादेव मंदिराजवळ असलेल्या हिंदू स्मशानभूमी परिसरातील अतिक्रमण काढण्यात यावे, या मागणीसाठी वाघूर विकास आघाडीतर्फे कालपासून सुरू असलेले साखळी उपोषण बुधवारी (ता. १९) निवासी नायब तहसीलदार प्रशांत निंबोळकर यांच्या भेटीनंतर मागे घेण्यात आले. याबाबत अधिक माहिती अशी की, पहूर पेठ येथील हिंदू स्मशानभूमी नजीक होत असलेले अतिक्रमण काढण्यात यावे यासंदर्भातत वाघूर विकास आघाडीतर्फे सुकलाल बारी व सहकाऱ्यांनी तहसीलदारांकडे अतिक्रमण काढण्याची मागणी केली होती. अतिक्रमण न काढल्यास साखळी उपोषण करण्यात येईल असा इशारा देण्यात आला होता . त्यानुसार कालपासून साखळी उपोषण सुरू होते . तथापि या प्रकरणी अतिक्रमण धारक तजमुलखा अजीज पठाण भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालय जामनेर येथे सुनावणी सुरू असून याविषयी अंतिम निर्णय २८ जून रोजी घेण्यात येणार आहे. त्यामुळे भूमी अभिलेख कार्यालयाच्या खुलासा प्राप्त होताच त्वरित अतिक्रमण काढण्याविषयी न्यायोचित कार्यवाही करण्यात येणार असल्याचे लेखी पत्र तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नानासाहेब आगळे यांनी दिल्याने संबंधित साखळी उपोषण मागे घेण्यात आले.

आज सायंकाळी ५ वाजता निवासी नायब तहसीलदार प्रशांत निंबोळकर, पोलीस निरीक्षक सचिन सानप, मंडळ अधिकारी श्रीमती मृणाल उंबरकर, तलाठी प्रमोद इंगळे यांच्यासह ग्रामपंचायात सदस्य अशोक जाधव, सुधाकर शिंनगारे, ज्ञानेश्वर घोलप, रवींद्र पांढरे ग्रामस्थ, पत्रकार उपस्थित होते.



# तरुणांची पोलिसांनी केली राहण्याची सोय

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी- चिंचवड :** पोलीस आयुक्तालयातील पोलीस शिपाई यांच्या २६२ रिक्त पदांसाठी आजपासून भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अवघ्या महाराष्ट्रातून १५ हजारांपेक्षा अधिक उमेदवारांनी अर्ज केला आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो उमेदवार पिंपरी- चिंचवड शहरात दाखल झाले आहेत. परंतु, पहिल्या दिवशी तरुणांना मिळेल त्या ठिकाणी झोपून काढावे लागले. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने बाहेर गावावरून आलेल्या परीक्षार्थींना भोसरी गवळी माथा (भोसरी- निगडी रोड) येथील बालनगरी येथे राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. अशी माहिती अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी यांनी दिली आहे. महाराष्ट्रात पोलीस भरती प्रक्रिया राबवली जात आहे. शासकीय नोकरी मिळावी म्हणून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आणि ग्रामीण भागातून आलेल्या तरुणांना मिळेल त्या ठिकाणी झोपावे लागत आहे. अशावेळी पिंपरी- चिंचवड पोलिसांनी या परीक्षार्थींची राहण्याची विशेष सोय केलेली आहे.

# पावसाने मारली दडी, बळीराजा चिंताग्रस्त

## शेतकऱ्यांनी सध्या पेरणी करू नये : कृषी विभागाने दिला सल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** सध्या मार्केटमध्ये शेतकरी आपल्या लेकरांच्या भविष्यासाठी बुक स्टॉलवर आणि वर्तमानात काळ्या आईची मशागत करण्यासाठी बी बियाणांच्या दुकानावर गर्दी करत आहे. हवामान खात्याने जुनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवढ्यामध्ये पाऊस पडण्याचे अंदाज उरतावले होते. मात्र मृग नक्षत्रात पावसाने दडी मारली आहे. पाऊस झाल्या नसल्यामुळे बळीराजा चिंताग्रस्त असून त्याच्या नजरा आभाळाकडे लागलेल्या आहेत. राज्यात मृग नक्षत्रात पाऊस पडेल असे हवामान खात्याने वर्तवले होते. या आशेवर अनेक शेतकऱ्यांनी नित्यवर्षा प्रमाणे नांगरणी, वकरटी केली, शेतातील केरकचरा वेचून आपली शेती सज्ज ठेवली आहे. परंतु, पाऊसच होत नसल्याने जमिनीत ओलावा नाही. कोरडया मातीत बी कसे पेरायचे हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे. हवामान खात्याने जुनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यातच मान्सून सक्रिय होईल, असा अंदाज वर्तवला होता. मात्र विपरजॉय चक्रीवादळाने केरळच्या सीमेवर आलेला मान्सून निष्क्रिय झाल्याचे हवामान खात्याचे अंदाज आहे. पूर्वी मृग नक्षत्रात पेरणी व लागवडीसाठी आवश्यक असणारे पाऊस हमखास जूनमध्ये पडत होते. त्यामुळे खरीप हंगामातील पेरणी वेळवर होत होती. याचा फायदा म्हणजे पीक वेळवर येऊन रब्बी हंगामासाठी शेती सज्ज राहत होती. मात्र अलीकडे जून महिन्यात मुबलक पाऊसच होत नाही. थोड्याफार पावसावर पेरणी झाली तरी पुन्हा पाऊस झाला नाही तर दुबार पेरणीचा धोका निर्माण होत आहे. यंदा तर पाऊसच रेंगाळल्याने बळीराजाच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत. तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात जवळपास तीस हजार हेक्टरवर खरीप हंगामातील पेरणीचे नियोजन आहे. यामध्ये प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, तुरीचा पेरा सर्वाधिक असणार आहे. तर उडीद, मुगाची पेरणी त्या तुलनेत अल्प प्रमाणात होणार आहे.८० ते १०० मिलीमीटर पावसानंतरच पेरणी करावी. कमी



पावसात जमिनीत ओलावा कमी प्रमाणात असतो. त्यामुळे पेरणी उलटण्याची शक्यता असते. म्हणून शेतकऱ्यांनी सध्या पेरणी करू नये, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

दरवर्षी प्रमाणे यंदा ही पावसाने दडी मारली आहे . शेतकऱ्यांना शेती आणि माती हेच त्याच्या कष्टाच साधन आहे . मात्र जर पावसाने साथ नाही दिली तर त्याच्या कष्टावार पाणी फेरल जात . बळीराजा कोप नाही वृष्टी होऊ दे .

**शेतकरी दिगंबर पाटील, प्रगतिशील जगदंबे पिंपळगावकर**

सध्या पावसाने दडी मारल्यामुळे पेरणी उशिराने होणार आहे . पेरणी थोडी उशिरा झाली तरी चालेल पण दुबार पेरणी टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी मुबलक पाऊस पडण्याची वाट बघावी तसेच बी बियाण सावधपणे निवडावे

**नारायण पाटील पवार, प्रगतशील शेतकरी रामपूर**



# सर्वसामान्यांना आधार देऊन अडचणीत धावून येतो तोच खरा शिवसैनिक

## जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** शिवसेनेचा आज ५८ वा वर्धापन जालना जिल्ह्यात रक्तदान व सामाजिक उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, माजी जि.प. अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, डॉ.राजेश राऊत, शहरप्रमुख घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोठीवाले, माजी नगरसेवक विजय पवार, बळीराम ढवळे,आयोजक दलित आघडीचे शहरप्रमुख संजय रत्नपारखे, गांगुताई वानखेडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. जालना शहरातील शिवसेना भवन येथे दलित आघाडीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी पदाधिकारी व शिवसैनिकांना उद्देशून बोलतांना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, सामान्यांच्या अडचणीमध्ये व सुखदु:खात धावून येणारा जनतेची सेवा करणाराच खरा शिवसैनिक आहे. शेतकरी, कामगार, शेतमजूर व सर्व सामान्य नागरिकांची सेवा हेच खरे पक्षाचे ध्येय आहे. अशा या कार्यशाळेत बाळासाहेबांमुळे आम्ही तयार झालो. सामान्यांसाठी झटतो. आज राजकारण गढूळ झाल्याने ते पैशा भोवती फिरत असल्याचे दिसते. बाळासाहेबांना नेहमी सामान्यांची सेवा अपेक्षित होती. त्यामुळेच ते २० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण करा असे सातत्याने शिवसैनिकांना सांगायचे. शिवसेनेमुळे सामान्य व्यक्ती जिल्हा परिषद अध्यक्ष, नगराध्यक्ष, आमदार,




खासदार व मंत्री पदापर्यंत पोहोचला. सामान्य माणसाला शिवसेना अत्यंत जवळचा वाटणारा पक्ष आहे. अनेक वेळा निवडून आलेल्या काही लोकांनी मात्र पक्षाशी श्वासघात केला. आज शिवसेना पक्ष ५८ वर्षांचा झाला पण आजही शिवसेनिक ताठ मानेने उभाआहे त्यामुळे घराघरात शिवसेना पक्ष न्या जनतेची सेवा करा, असेही अंबेकर म्हणाले. यावेळी रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान केले. यावेळी संदीप मगर, बंडू केळकर, जीवन खंडागळे, किशोर नरवडे, बळीराम तिडके, संतोष क्षत्रिय, सोनाजी खांडेभराड, रामेश्वर कूरिल, शिवसैनिक, पदाधिकारी व जालना ब्लड बँकेचे कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# कळंब येथे डॉ.विठ्ठल लहाने यांचे विद्यार्थी, पालकांना करिअर विषयक मार्गदर्शन

## उपस्थित राहण्याचे जाजू कुटुंबाचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** येथे रविवारी 30 जून रोजी -दुपारी ठीक एक वाजता कळंब येथील शि म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाच्या सभागृह मध्ये लहान मुलांच्या व्यंगावर हजारो मोफत शस्त्रक्रिया करून त्यांच्या ओठावर हसू फुलवणारे जगप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने हे आपल्या आयुष्याचा यशस्वी प्रवास उलगडून सांगणार आहेत पण त्याचबरोबर पालक, विध्यार्थी यांना करिअरबाबत विशेष मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम गुणवंताच्या पाठीवर कौतुकाची थाप देणारा, त्यांना प्रोत्साहन देणारा आहे. प्रत्येक पालकांना, विध्यार्थ्यांना पुढील दिशा देण्यासाठी महत्वाचा ठरणार आहे. त्यामुळे 30 जून 2024



ला या कार्यक्रमास आवश्य उपस्थित रहावे , असे आवाहन -कै. किशनलाल जाजू, कै गोविंद जाजू स्मृती समारोह समिती कळंब यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# एनडीआरएफचे आपत्ती निवारणासाठी प्रात्यक्षिक

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** संभाव्य आपत्तीच्या पार्श्वभूमीवर गुरूवारी सांगलीत एनडीआरएफच्या जवानांकडून नदीपात्रामध्ये आपत्ती प्रसंगी बचाव प्रात्यक्षिक करण्यात आली. महापालिका आयुक्त शुभम गुप्ता आणि एनडीआरएफचे प्रमुख महेंद्रसिंग पुनिया यांच्या उपस्थितीत कृष्णा नदी पात्रामध्ये हे प्रात्यक्षिक संपन्न झाले. प्रत्यक्ष आपत्ती काळात नदीपात्रामध्ये किंवा पाण्याच्या प्रवाहामध्ये नागरिकांनी स्वतःचा बचाव कसा करायचा , यासाठी कोणकोणती घरगुती साधने वापरायची याची माहिती देण्यात आली. तसेच प्रत्यक्ष नदीपात्रात जवानांनी उतरून आपण आपत्कालीन परिस्थितीमध्ये आपला बचाव कसा करू शकतो हे सर्वांना प्रात्यक्षिक अशा माध्यमातून दाखवून दिले. एनडीआरएफची टीम दि. १६ जूनपासून सांगलीमध्ये दाखल झाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून जिल्हा प्रशासन महापालिका प्रशासन आणि एनडीआरएफ अशा संयुक्तरित्या विविध विभागांच्या अधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले. आणि आज प्रत्यक्ष नदीपात्रामध्ये या सर्व अधिकारी कर्मचारी यांना एनडीआरएफकडून आपत्ती काळातील बचाव प्रात्यक्षिक दाखवण्यात आली. एनडीआरएफ पथक दि. ३० ऑगस्टपर्यंत सांगली जिल्ह्यामध्ये वास्तव्यास असणार आहे . हे पथक उद्यापासून जिल्ह्यातील गावांना भेटी देणार आहे.

# टोमॅटोचा भाव लाल, मिरचीचा ठसका तर गवार, भेंडी, शेवगा १२० रुपये किलो

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील देवळगाव गुजरी व सावळदबारा परिसरात आठवडी बाजारात ऋतू बदलामुळे भाजीपाल्याच्या दरात प्रचंड वाढ झाली आहे. यात टोमॅटोचा भाव अधिक लाल झाला असून, शंभर रुपये किलोपर्यंत जाऊन पोचला आहे, तर दुसरीकडे मिरचीचा १२० रुपये किलो भावाचा ठसका नागरिकांच्या खिशाला जड झाला आहे. तर इतर भाजीपालाही ८० रुपये किलोपर्यंत जाऊन पोचल्याने सामान्य नागरिकांच्या खिशावर ताण पडत असल्याने देवळगांव गुजरी आठवडे बाजारातही भाजीपाला खरेदीची गर्दी कमी दिसून येत आहे.

गतवर्षी अल्प पाऊस झाल्याने दुष्काळ पडला होता. त्यामुळे खरिपासह रब्बी पीक वाया गेले होते. त्यामुळे एप्रिल, मे महिन्यात ज्यांच्याकडे पाण्याची व्यवस्था आहे, अशा शेतकऱ्यांनी थोड्याफार प्रमाणात भाजीपाल्याची लागवड केली होते. परिणामी सध्या बाजारात भाजीपाल्याची आवक कमी झाली आहे. त्यामुळे भाजीपाल्याचे भाव कडाडले आहेत. यात प्रामुख्याने टोमॅटोचा भाव अधिक लालभडक झाला आहे. टोमॅटोचा भाव तब्बल शंभर रुपये किलोपर्यंत जाऊन पोचला आहे. तर भेंडी, गवार, शेवग्याच्या शेगांचा भाव तब्बल १२० रुपये किलोपर्यंत जाऊन पोचला आहे. तर इतर भाजीपाला ही ८० रुपये किलोपर्यंत जाऊन पोचल्याचे वरुळ येथील मंगळवारच्या आठवडी बाजारात दिसून आले. भाजीपाल्याचे भाव वाढल्याने सामान्य नागरिकांच्या खिशावर ताण पडत असल्याने भाजीपाला खरेदीकडे ग्राहकांचा कलही कमी झाल्याचे चित्र आहे.

**देवळगाव गुजरी येथील मंगळवारच्या आठवडे बाजारातील भाव रू :** टोमॅटो १०० किलो, हिरवी मिरची १२० किलो, गवार १२० किलो, भेंडी १२० किलो, वांगे ८० किलो,कोबी ८० किलो, चवळीच्या शेंगा ८० किलो, अद्रक १६० किलो, कांदे ४० किलो, बटाटे ४० किलो, शेवगा १२० किलो, मेथी २० रुपये एक जुडी, कोथिंबीर १५ एक जुडी, पालक २० रुपये जुडी, शेपू १० रुपये जुडी



# राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालयात ‘मॉडेल मैत्री क्लिनिक’चे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत आज जिल्हा रुग्णालयात ‘मॉडेल मैत्री क्लिनिक’चे आज उद्घाटन करण्यात आले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या हस्ते हे उद्घाटन करण्यात आले. निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ. प्रशांत बडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नागेश सावरगावकर, डॉ. अश्विन पाटील, विभागीय कार्यक्रम व्यवस्थापक अक्रूर सोळुंके, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. विनायक मुंडे, जिल्हा आर.के.एस.के.समन्वयक पांडुरंग आवचार, जिल्हा रुग्णालय स्तरावरील सर्व जिल्हा कार्यक्रम समन्वयक व तालुकास्तरीय आर. के. एस. के. समन्वयक उपस्थित होते. मॉडेल मैत्री क्लिनिक स्थापन करण्यामागे किशोर वयीन मुला मुलींच्या प्रजनन व लैंगिक आरोग्यामध्ये सुधारणा करणे हा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत १० ते १९ वर्ष वयोगटातील जिल्हयातील सर्व मुला, मुलींना आरोग्य विषयक सल्ला व उपचार सेवा दिला जातो. एकुण लोकसंख्येच्या २२ टक्के लोकसंख्या ही किशोरवयीन मुला, मुलींची असते. किशोर अवस्थेमध्ये प्रजजन व लैंगिक आरोग्य व पोषण आहार, मानसिक आरोग्य व हिंसा, व्यसनाधिनता व असंसर्गजन्य आजार या सहा विषयांचा या राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत समावेश होते. या अंतर्गत जवळपास एकुण ५१ प्रा.आ.केंद्र, १० ग्रामीण रुग्णालय, ३ उपजिल्हा रुग्णालय स्तरावर मैत्री क्लिनिक स्थापन करण्यात आले आहे. या क्लिनिक द्वारे खालील आरोग्य सेवा पुरविल्या जातात.

**१. किशोर वयीन मुलींना दरआठवडयाला एक या प्रमाणे लोहाच्या गोळयांचे वाटप होते.**

**२. किशोर वयीन मुलींना मासिक पाळीमध्ये स्वच्छते विषयी मार्गदर्शन व अल्पदरात उपलब्ध करुन देण्यात येते. ३. तसेच किशोरवयीन मुला, मुलीची माहीती ही गोपनिय स्वरुपात ठेवली जाते**

**४. काही स्वरुपात संदर्भ सेवा ही दिली जाते.**

# भोकर बसस्थानकाची दूरवस्था

## चालक व टुल-टायरची कमतरता : पावसात छताला गळती

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील बसस्थानक मागील पन्नास ते पंचावन्न वर्षांपूर्वी उभारण्यात आलं आहे. आज घडीला त्याची मूद्दत संपत आल्याने दूरावस्था झाली आहे.पावसाळ्यात छताला गळती लागते. प्रवाशानां जीव मुठीत धरून बसावे लागत आहे. या शिवाय चालक आणि टुल-टायरची कमतरता आहे.याभागातील लोकप्रतिनिधींनी प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन नवीन इमारत उभारण्यासाठी पूढाकार घेणं गरजेचं आहे. महाराष्ट राज्य परिवहन महामंडळानी "बहूजन हिताय बहुजन सुखाय" असे ब्रिद ठेवून "प्रवाशांच्या सोयीसाठी " राज्यात सर्वत्र बसेसची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.ऊनवारा,पाऊस,थंडीचा सामना करीत प्रवाशांची सेवा केली जात आहे.याच भरवशावर तालुक्यातील बहुतांश प्रवासी बसने प्रवास करणे पसंत करीत असतांना दरम्यान मध्येच खासगी प्रवासी वाहतूकदारांनी प्रवाशांना आकर्षित केल्याने आगाराच्या उत्पन्नात घट झाल्याचे समजते.यातुन कसेबसे सावरत उत्पन्न वाढिसाठी एकपाऊल पुढं टाकल आहे.यात प्रामुख्याने अमृत जेष्ठ नागरिक सवलत आणि महिला सन्मान योजनेमुळे येथील आगाराला दरढोही ५ ते ६ लाखाचे उत्पन्न होत आहे. येथील आगारात एकूण ५४बसेस असून दररोज (१७ हजार७४५) किलोमीटरचा प्रवास होतो. लांब पल्ल्याच्या मार्गावरील तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या पंढरपूर,शेगाव, अक्कलकोट, सोलापूर, अहमदनगर ठिकाणी प्रवाशांसाठी सोय करण्यात आली आहे.चालकाची एकूण (११८),वाहक(११८) अशी मंजूर पदे असले तरी चालक(२१),वाहक(तीन) पदे भरली नाही.यात्रिंकी कामगार (४६), सफाई कामगार (दोन) पदे कार्यरत आहेत. बसस्थानकात



स्वच्छता गृह, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वतंत्र कॅटिंग (हॉटेल),शालेय विद्यार्थ्यांना मानल विकास योजनेअंतर्गत बसेसच्या फे-या त्यानंतर प्रवाशांसाठी फे-याची आखणी करण्यात आली आहे. शालेय विद्यार्थ्यांना शाळेत जावून पासेस दिले जातात.

**आगार राज्यात क्रमांक तीनवर :** येथील आगारातील सर्वच बसेसची गुणवत्ता चांगली असल्याने अपघात मुक्त आगार म्हणून ओळख निर्माण झाली आहे . नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणात आगारास राज्यात क्रमांक तीनचा दर्जा देण्यात आला आहे . औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने लवकरच बसस्थानकाच्या प्रांगणात सिमेंट कॉंक्रेटिकरण करण्यात येणार आहे .

**पंढरपूर यात्रेसाठी विशेष सूविधा :** पुढिल महिन्यात आषाढी एकादशी निमित्त तिर्थक्षेत्र पंढरपूर येथे जाण्यासाठी प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून विशेष सूविधा करण्यात आली आहे .ज्या गावात ४५ प्रवाशी थेट यात्रेसाठी जाणार असतील तीथे बस पाठवली जाणार आहे .भावीकानी आमच्याशी संपर्क साधावा
**नामदेव पुंडेगे , आगार प्रमुख ,भोकर**

# तरुणीला मारहाण; मित्रांवर गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मैत्रीमध्ये झालेला वाद मिटवण्यासाठी बोलवून घेत तरुणीला शिवीगाळ करुन धमकी देऊन तिच्यासोबत अश्लील कृत्य केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार ११ मार्च आणि २२ मे रोजी सेनापती बापट रस्त्यावरील एका शासकीय इमारतीच्या पार्किंगमध्ये आणि दीप बंगला चौकात घडला आहे. याप्रकरणी तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत तरुणीने चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार प्रतीक बाळकृष्ण काकडे (वय ३०), प्रज्योत बाळकृष्ण काकडे (३२, रा. बालाजी अपार्टमेंट, नवी सांगवी) आणि आश्विन पवार (२९, रा. वसई) यांच्यावर विनयभंगासह अन्य कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.
फिर्यादी सेनापती बापट रस्त्यावरील एका शासकीय कार्यालयात काम करतात. आरोपी प्रतीक आणि फिर्यादी एकमेकांचे मित्र असून त्यांच्यात वाद झाले होते. मैत्रीत झालेला वाद मिटवण्यासाठी आरोपी प्रतीक याने फिर्यादी यांना फिर्यादी काम करत असलेल्या कार्यालयाच्या पार्किंगमध्ये बोलवून घेतले. त्या गेल्या असता आरोपी प्रज्योत त्या ठिकाणी होता. त्याने फिर्यादी यांना शिवीगाळ केली. त्यामुळे फिर्यादी त्यांच्या दुसऱ्या कार्यालयाकडे निघाल्या. आरोपींनी त्यांचा पाठलाग करुन दीप बंगला चौकात अडवून शिवीगाळ करून धमकी दिली. त्यानंतर फिर्यादी यांना पुन्हा वाद मिटवण्यासाठी प्रतीक याने बोलवून घेतले. त्यावेळी आरोपींनी शिवीगाळ केली. तर प्रज्योत आणि आश्विन यांनी फिर्यादी यांच्यासोबत गैरवर्तन केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस उपनिरीक्षक शामल पाटील पुढील तपास करत आहेत.



# कवठे येमाई प्राथमिक शाळा पूर्व तयारी मेळावा क्रमांक दोन संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**कवठे येमाई :** शिरूरच्या पश्चिम भागातील एक जुनी व मोठी प्राथमिक शाळा म्हणून गणल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवठे येमाई येथे आज गुरुवार दि.२० रोजी इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळा पूर्व तयारी मेळावा क्रमांक दोन संपन्न झाला यावेळी शिक्षक, पालक,शाळा व्यवस्थापन समितीचे मान्यवर उपस्थित होते.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक सखाराम फंड हे होते यावेळी शाळेतील तज्ञ शिक्षिका आशा पवार यांनी पहिलीच्या वर्गात दाखल होत असलेल्या नवीन विद्यार्थ्यांची विविध प्रकारची बौद्धिक परीक्षा घेऊन काही पालकांना ही प्रश्न विचारण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षिका, शाळा शिक्षण समितीचे अध्यक्ष दिनेश पोळ,उपाध्यक्ष डॉ.आरती उचाळे, अर्चना देवकर,शिक्षण तज्ञ संचालक तथा जेष्ठ पत्रकार प्रा. सुभाष अण्णा शेटे,भाऊसाहेब घोडे,सालकर इतर सदस्य,ग्रामपंचायत सदस्या वैशाली रत्नपारखी,सुभाषराव उघडे,सालकर उपस्थित होते यावेळी सर्व नवीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या घेतलेल्या बौद्धिक चाचणी चाचणीत योग्य ती उत्तरे दिल्याने उपस्थित सर्वांनी समाधान व्यक्त केले. उपस्थितांचे आभार शिक्षिका प्रमिला मेसे यांनी मानले.

# नगर-मनमाड रस्ताने घेतला वृद्धाचा बळी

## रस्ता खोदला पावसाने ठिकठिकाणी खड्डे पडले

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** राहुरी फॅक्टरी येथील नगर-मनमाड मार्गावर सेल पेट्रोल पंपानजीक इर्टीगा कार व दुचाकीचा अपघात झाला असून या अपघातात दुचाकीवरील राहुरी फॅक्टरी येथील रहिवासी रंगनाथ गंगाधर आरंगळे(वय-६१) यांचा मृत्यू झाला आहे. शिर्डीकडून शनिशिंगणापूरकडे परराज्यातील भाविक घेऊन चाललेल्या एम एच २० एफ जी-७०२७ या इर्टीगा कारने फॅक्टरीकरून लोणीकडे जनावरांच्या बाजारासाठी जात असलेल्या हिरो होंडा पॅशन क्रमांक एमएच १७ ए एस -१६२२ या दुचाकीस जोराची धडकी दिली. या धडकेत दुचाकीचालक रंगनाथ गंगाधर आरंगळे(वय-६१) यांचा जागीच मृत्यू झाला.तर दुचाकीवर पाठीमागे बसलेले शंकर रामचंद्र शिंदे(राहुरी फॅक्टरी) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर राहुरी शहरातील लाईफ इन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपचार सूरु आहेत. अपघातानंतर ईर्टीगा कारने तीन ते चार पलटी मारल्या. या ईर्टीगा कारमधील ओरीसा राज्यातील सुस्मिता संतोष पुष्टी(वय-४६) हे जखमी असून त्यांच्यावर राहुरीत लाईफ इन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. रंगनाथ आरंगळे यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात तसेच जखमींना राहुरीत उपचारासाठी नेले. अपघातस्थळी राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकोन्स्टेबल बाबासाहेब शेळके यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.
नगर-मनमाड रस्ता दुरुस्ती कामासाठी ठिकठिकाणी एक बाजूला रस्ता खोदला असून एकेरी वाहतूक सूरु आहे. नगर-मनमाड रस्त्याचे काम अतिशय संथगतीने व निकृष्ट पद्धतीने सूरु आहे. दुरुस्त केलेल्या रस्त्यावर पहिल्याच पावसाने ठिकठिकाणी खड्डे पडले आहे. या रस्त्यावर अनेक निष्पाप बळी गेले असून आणखी किती बळी हा रस्ता घेणार असा सवाल युवा नेते सुजित सुरेश वाबळे यांनी उपस्थित केला आहे.

# टँकरमध्ये महिलेचा आढळला मृतदेह

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुण्यातील हडपसर भागातील फुरसुंगी येथे पाण्याच्या टँकरमध्ये २५ वर्षीय महिलेचा मृतदेह आढळल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. कौशल्या मुकेश चव्हाण वय २५ असे मृत महिलेचे नाव आहे. फुरसुंगी येथील पॉवर हाऊसजवळ असलेल्या एका घरी पाणी पोहोचवण्याकरिता (एमएच १२, डब्ल्यूजे १०९१) या क्रमांकाचा टँकर गेला होता. त्यावेळी पाईप पाण्याच्या टाकीत सोडण्यात आला. मात्र पाणी काही आले नाही. त्यावेळी वॉल्व्ह चेक करून देखील पाणी आले नाही. त्यानंतर पाईप काढून पाहिल्यावर आतून साडी आल्याचे त्यांना दिसले. त्यानंतर चालकाने टँकरचे झाकण उघडून पाहिल्यावर आतमध्ये एक महिलेचा मृतदेह आढळून आला. त्या महिलेबाबत आसपासच्या पोलीस स्टेशनमध्ये मिसिंगची तक्रार आली आहे का ? याबाबत चौकशी केल्यावर एक महिला घरात कोणालाही न सांगत निघून गेल्याची तक्रार कोंढवा पोलिसाकडे असल्याची माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे मृत महिलेच्या पतीला चौकशीकरिता बोलवलं असून अधिक तपास सुरु आहे.





जुना जालना शहरातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्या जवळील भागात रस्त्याचे काम सुरू असून त्यामुळे ट्राफिक जाम होत आहे. छायाचित्र : किरण खानापुरे

# पक्षाने तिकीट दिले तरच लढणार : किरण डोणगावकर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** पक्षाने तिकीट दिले तरच लढणार असा खुलासा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष किरण डोणगावकर यांनी केला आहे. खुलताबाद तालुका काँग्रेस पक्ष शहर व ग्रामीणची शनिवारी (दि.१५) आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी किरण पाटील डोणगावकर हे होते. यावेळी आबेद जाहगिरदार, अकबर बेग, शहराध्यक्ष समद शेख, ग्रामीण तालुकाध्यक्ष अनिल श्रीखंडे, भिमराव नलावडे, विलासराव गायकवाड, मजहर शेख, आजी-माजी नगराध्यक्ष, उपाध्यक्ष, पं. स. सभापती उपसभापती, सरपंच, उपसरपंच चेअरमन व्हा. चेअरमन, पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते. यावेळी शहर व ग्रामीण तालुक्यातील अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर अनेकांनी साम-दाम-दंड-भेदची तयारी दाखवत पक्ष किंवा अपक्ष म्हणून विधानसभा लढवा असा सल्ला दिला. तर अनेकांनी पक्षा शिवाय लढायचे नाही असा सल्ला दिला. यावर उपाध्याक्ष किरण पाटील डोणगावकर यांनी सर्वांचे ऐकून घेत शेवटी काँग्रेस पक्षांनी तिकीट दिले तरच लढायचे, नसता नाही. असा खुलासा केला. चार महिन्यांनंतर विधानसभा निवडणुक असल्याने सर्वच पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, बैठका घेत असल्याचे दिसून येत आहे.

# दोन पक्षांच्या कुबड्या आधारे मोदी सरकार सत्तेवर चढले

## किसान सभेचे सरचिटणीस कॉम्रेड राजन क्षीरसागर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशातील शेतकरी असंतोषामुळे भाजप सरकारला एकहाती बहुमत गमवावे लागले दोन पक्षांच्या कुबड्या आधारे नरेंद्र मोदी सरकार



सत्तेवर चढले आहे. अद्याप सरकार वरील विश्वासमत देखील संमत झालेले नाही. अशा परिस्थितीत भाजपच्या नरेंद्र मोदी सरकारने शेतकरी असंतोषातून बसलेल्या फटका असताना देखील शेतकरी द्वेषाचे अर्थकारण बदलले नाही. शेतकऱ्यांना केवळ सरासरी 6.8% अत्यंत तुटपुंजी शेतमालाच्या MSP भावामध्ये वाढ देवून शेतकऱ्यांशी आर्थिक युद्ध चालूच ठेवले आहे. केंद्र सरकारच्या या अन्यायाविरुद्ध दि 24 जून ते 29 जून या काळात संघर्ष सप्ताह पाळून रस्त्यावर उतरुन किसान सभेच्या सत्याग्रह आणि निदर्शनात सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य किसान सभेचे सरचिटणीस कॉम्रेड राजन क्षीरसागर यांनी केले आहे. नरेंद्र मोदी सरकारचे शेतीविषयक धोरण हे भारतीय शेतकऱ्यापेक्षा ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेतील शेतकऱ्यांना फायदेशीर होण्यासाठी राबविले जात आहे.

2020-21 ते 2023-24 या कालावधीत परदेशी शेतीमाल व कृषीउत्पादने याची आयात वर्षाकाठी सुमारे 3 लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. या स्वस्त शेतीमाल आणि कृषीउत्पादने यातून देशातील शेतकऱ्यांना उध्वस्त केले जात आहे याच बरोबर खते आणि शेती अवजारे याची सबसिडी बंद करून त्यावर GST कराचा बोजा लावून लागवड खर्चात प्रचंड वाढ करण्यात आली आहे. दुष्काळी मदत, पीकविमा यात शेतकरी विरोधी धोरण राबवून नैसर्गिक संकटात शेतकऱ्यांना कर्जबाजरी व्हावे लागत आहे. कार्पोरेट कंपन्यांच्या हितसंबंधासाठी आयात परवाने मोकाट द्यायचे आणि शेतकऱ्यांना लाभ देण्याची वेळ आली कि निर्यातबंदी लादायची हा अनुभव महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोदी सरकारच्या काळात सातत्याने आलेलाच आहे. सर्वात जास्त आत्महत्याग्रस्त असलेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी कापूस या नगदी पिकाची हमी किंमत अत्यंत कमी वाढ दिली आहे हि संतापजनक बाब आहे. देशातील कोरडवाहू कापूस उत्पादक शेतकऱ्यांना उध्वस्त करण्यासाठी भाजप सरकारने 2022-23 आर्थिक वर्षात करमुक्त कापूस आयात 200% वाढविण्यात आली आहे. या मध्ये 1703.37 बिलियन डॉलर्स किमतीची म्हणजे सुमारे 15 हजार कोटी रुपयांची कापूस गाठींची आयात करून कापूस उत्पादकांना मरणासन्न यातना भोगावयास यातना दिल्या आहेत. अशीच बाब सोयाबीन या कोरडवाहू शेतकऱ्यांच्या नगदी पिकाबद्दल आहे 164.7 लाख मेट्रिक टन पाम टेल आणि अन्य सोया उत्पादने आयात करून सोयाबीन उत्पादकांचे कंबरडे मोडले आहे. यातून सर्वाधिक कापूस उत्पादनाचे क्षेत्र असलेल्या (सुमारे 42 लाख हेक्टर) महाराष्ट्र राज्यात दर 8 तासाला शेतकरी आत्महत्या होत आहेत.

383 दिवस चाललेल्या शेतकरी आंदोलनास शेतीमालाच्या हमी भावाचा हक्क देणारा कायदा करण्याचे दिलेले आश्वासन हवेत विरले आहे. उलट विदेशी शेतमालाची करमुक्त आयात करून कापूस, सोयाबीन शेतीमालाचे भाव पाडले आहेत. शेतमालाच्या हमी भावाची किंमत निश्चित करताना वापरलेले सूत्र कोणत्या गृहितकावर वापरले यामध्ये कोणतीही पारदर्शकता आणि वास्तविकता कधी मोदी सरकारने पाळली नाही. बियाण्याचा काळाबाजार, खताची टंचाई आणि लिंकिंग च्या नावाने लुबाडणूक, बनावट खते आणि औषधे प्रचंड वाढविण्यात आलेली वीज दरवाढ आणि येवू घातलेली प्रीपेड मीटर पद्धती, बँकांची पीक कर्जासाठी चालविलेली अडवणूक व विमा कंपन्यांची फसवणूक फुटके गळके आणि आताशा कायमच कोरडे राहणारे सिंचन घोटाळ्यांचे कालवे त्यातच हवामान बदलाचे संकट एवढ्या प्रतिकूल संकटांचा सामना करीत जीवन जगणाऱ्या शेतकरी-शेतमजुरांना आपल्या घामाचे मोल देण्यासाठीचा शेतमालाचा आधारभूत किंमत देणारा कायदा अस्तिवात नसावा हे लोकशाहीला काळिमा फासणारी बाब आहे.

मंदसौर येथील शेतकऱ्यांवर गोळीबार करणाऱ्या मध्यप्रदेश सरकारचे प्रमुख यांना कृषीमंत्री पदावर बसवून शेतकऱ्यांविरुद्ध आर्थिक युद्ध चालूच राहणार याची पावतीच जणू भाजप सरकारने दिली आहे. याविरुद्ध शेतकऱ्यांनी सत्ताधाऱ्यांचा हिशोब चुकता करण्याची जबाबदारी शेतकरी पार पाडल्याशिवाय राहणार नाही हा इशारा देत आहेत.



# कोपरगावात पोलीस बंदोबस्तात अवैध कत्तलखाने उद्ध्वस्त

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** कोपरगावात दोन दिवसांपूर्वी अवैध कत्तलखान्यामध्ये गोवंश जातीचे जनावरांची कत्तल होत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाल्यानंतर प्रशासनाने कारवाई केली होती. त्यानंतर हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या होत्या अवैध व्यवसायांवर तात्काळ कारवाई करा अशी एकमुखी मागणी करण्यात आली होती त्या पार्श्वभूमीवर . काल कोपरगाव नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाला गोरक्षक दल आणि हिंदुत्ववादी संघटनांनी निवेदन देऊन २४ तासाच्या आत अवैध कत्तलखाने उध्वस्त करण्याची मागणी केली होती त्याची गंभीर दखल कोपरगाव नगर परिषद व पोलीस प्रशासनाने घेतली त्यानंतर आज गुरुवार दिनांक २० जुन रोजी कोपरगाव शहरातील आयशा कॉलनी परिसरातील अवैध कत्तलखान्यांवरती कडक मोठ्या पोलिस बंदोबस्तात नगरपालिकेने दोन जेसीबी मशीन चार ट्रॅक्टर व मोठ्या प्रमाणावर कर्मचारी यांना बरोबर घेऊन या परीसरात असलेले पत्रा शेड व ज्या ठिकाणी गोमाता काटवणात ठेवण्यात येत होत्या त्या ठिकाणी असलेल्या वेड्या बाभळी व पत्रा शेड काढण्यात आले या वेळी आतिशिग्र कृती दलाचे जवान पोलीस होमगार्ड यांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता यावेळी मुख्याधिकारी सुभाष जगताप व पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख सपोनी रोहीदास ठोंबरे यांनी भाग घेतला.



# चिमुकल्यांची बैलगाडीतून मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**आसेगाव :** जि.प.प्रा.शा. खोजेवाडी केंद्र-आसेगाव येथे शैक्षणिक वर्ष 2024-25 शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांची गावातून प्रवेश दिंडी काढून नवागत पाहिलीच्या चिमुकल्यांची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, फुगे व चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात गोड भात वाटप करण्यात आला.

याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. कविताताई नवनाथ पहाड, उपाध्यक्ष श्रीमान कैलासभाऊ सुधाकर चक्रे, सदस्य श्रीमान हरिचंद्रभाऊ पहाड, श्रीमती रुबिनाभाभी शेख, श्रीम. नीताताई काळे, शाळेचे मुख्याध्यापक श्रीमान ज्ञानेश्वर धोंडकर सर व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

# व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात हजारो वृक्षांची कत्तल

आधुनिक केसरी न्यूज

**वाई :** पश्चिम घाटातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोन क्षेत्रातील मुनावळे (ता.जावली) गावच्या हद्दीत अवैध वृक्षतोडीचा प्रकार उघडकीस आला आहे. मागील तीन महिने हजारो वृक्षांची अवैध वृक्षतोड सुरु आहे. साताऱ्यातील धनिकाने ही वृक्षतोड केली आहे. मात्र सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी व वनविभागासह इतर शासकीय यंत्रणांनी अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. पुणे-मुंबईसह साताऱ्यातील काही बड्या धनिकांनी मुनावळे परिसरात जमिनी खरेदी केल्या आहेत. या जमिनींवर भूखंडमाफियांच्या सामूहिक टोळ्या सध्या कार्यरत असून त्यांनी आगामी जल पर्यटनाच्या विकास योजनांसाठी मोठ्या प्रमाणात जमिनी खरेदी करून ठेवल्याचे बोलले जात आहे. पुणे-मुंबईच्या या धनदांडग्यांनी शिवसागर जलाशयाच्या परिसरात आलिशान बंगले बांधण्याचे मनसुबे रचले आहेत. त्याचीच पूर्तता म्हणून मुनावळे गावच्या हद्दीत सर्व्हे नं. २९/२ क्षेत्रातील १९ एकर पैकी सहा एकर क्षेत्रामध्ये साताऱ्यातील एका धनिकाकडून अवैध जंगली झाडांची वृक्षतोड करून छोट्या-मोठ्या हजारो वृक्षांची कत्तल केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दरम्यान भारतीय वन अधिनियम व वन्यजीव संरक्षण अधिनियम महाराष्ट्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, महाराष्ट्र झाडे तोडणे अधिनियम, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम सारख्या अनेक महत्त्वाच्या कायद्यांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन झाले आहे. यावेळी पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला आहे. हे सर्व काम वनखात्याच्या कर्मचाऱ्यांच्या परस्पर मूक संमतीने सुरु असल्याचे उघड झाले आहे. परिणामी ज्या कार्यक्षेत्रात ही वृक्षतोड सुरू आहे त्या ठिकाणी काम करणारे वनपाल व वनरक्षक यांच्याशी संपर्क साधला असता त्यांना या प्रकाराची कोणतीही कल्पना नसल्याचे सांगितले.

# नांगरणी करणाऱ्या शेतकऱ्यावर हल्ला

## अकोले तालुक्यातील घटना : गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**अकोले :** तालुक्यातील कळस येथे शेतामध्ये नांगरणी करीत असणाऱ्या शेतकऱ्यावर शेजाऱ्यांकडून हल्ला करण्यात दगडफेकीत शेतकऱ्यासह ट्रॅक्टरचे नुकसान झाले असून अकोले पोलीस स्टेशनमध्ये या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की कळस येथील श्री दीपक पुंजा वाकचौरे हे त्यांच्या शेतामध्ये 19 जुन रोजी दुपारी दोन च्या दरम्यान नांगरणी करीत असताना शेजारील शेतकरी हे वावर नांगरून नको त्यांना शिवीगाळ केली हे वावर नांगरलं तर आम्ही तुझा खून करू अशी धमकी देऊन त्याच्या ट्रॅक्टरवर दगडफेक केली त्या दगडफेकी त्याला दगड लागले असून ट्रॅक्टरचे अतोनात नुकसान झाले आहे याबाबत अकोले पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर नंबर 747/ 2024 नुसार भादवि कलम 324,504, 506 अन्वये श्री रामभाऊ एकनाथ वाकचौरे व बाळासाहेब काशिनाथ वाकचौरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अकोले पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा तपास करण्यात येत आहे. पोलीस उपनिरीक्षक श्री खैरनार यांनी तातडीने भेट देऊन पंचनामा केला. माझ्या स्वतःच्या शेतजमिनी मध्ये मी जमिनीची नांगरणी करीत असताना मला ही व्यक्ती नेहमी त्रास देत असून यापूर्वी त्यांनी मला मारण्याची धमकी दिली असून तुझी जमीन पडीत पाडू अशी वेळोवेळी धमकी देत असून माझे वडील गावचे कामगार पोलीस पाटील होते त्यांच्या मृत्यूनंतर मला आधार राहिला नसून व भाऊ शारीरिक दृष्ट्या कमजोर असून आई आजारी असते बारीक मुली असल्याने आमच्याकडे शारीरिक दृष्ट्या सक्षम नसल्याचा फायदा घेऊन माझी जमीन बळकवण्याचा यांचा विचार आहे याबाबत कळस गावचे सरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्तीचे अध्यक्ष यांनी वेळोवेळी मध्यस्थी करून भांडण मिटवले आहे परंतु वरील व्यक्ती या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या असून यापूर्वी त्यांच्यावरती अनेक गुन्हे अकोले पोलीस स्टेशनमध्ये दाखल आहेत त्यामुळे या व्यक्तींपासून माझ्या जीविताला धोका असून या व्यक्तींचा ताबडतोब बंदोबस्त करून श्री रामभाऊ एकनाथ वाकचौरे, बाळासाहेब काशीनाथ वाकचौरे, छाया बाळासाहेब वाकचौरे, पुरुषोत्तम भाऊसाहेब वाकचौरे, भाऊसाहेब बबन वाकचौरे यांच्यापासून माझ्या जीविताला धोका असून मला न्याय मिळावा अशी विनंती दीपक पुंजा वाकचौरे यांनी केली आहे.

# शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर राबविण्यात येणाऱ्या बाबीकरीता शेतकऱ्यांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना व इतर तेलबिया पिकातील मूल्यसाखळीस चालना देणे या उद्देशाने राज्य पुरस्कृत विशेष कृती योजना सन 2022-23 ते 2024-25 या तीन वर्षात राबविण्यात येत आहे. सन 2024-25 मध्ये योजनेअंतर्गत चालू खरीप हंगाम मध्ये खालील निविष्ठा पुरविण्यात येणार आहेत. नॅनो युरिया सोयाबीन, नॅनो डीएपी सोयाबीन, नॅनो युरिया कापूस, नॅनो डीएपी कापूस करीता अर्ज करण्याचा कालावधी 30 जून 2024 पर्यंत आहे. तर मेटाल्डीहाईड सोयाबीन करीता 23 जून 2024 पर्यंत अर्ज सादर करावयाचा आहे.

वरील निविष्ठांचा पुरवठा करण्याकरीता लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जातून ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर दिनांक 12 जून 2024 पासुन सदर बाबींच्या टाईल्स उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. बियाणे, औषधे व खाते या टाईल अंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज करता येतील. तरी जास्तीत जास्त शेतकरी बांधवानी MAHADBT.MAHARASHTRA.GOV. IN FARMER LOGIN या वेबसाईड वर जाऊन ऑनलाईन अर्ज करावेत व योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.




# 'कसायाची आई शोभाताई' : बीजेपीने दिल्या घोषणा!

## खासदारांच्या वायरल क्लिपविषयी 'जोडे मारो' आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील नूतन खासदार शोभा बचाव यांच्या व्हायरल झालेला कॉल रेकॉर्डिंग क्लिप संदर्भात शहरात मोठा वाद निर्माण झाला आहे त्या ऑडिओ क्लिप मध्ये एका कसायाने फोनवरून खासदार शोभा बच्छाव यांना पकडलेल्या गुरढोरांच्या सुटकेसाठी विनंती केली आहे त्यात बच्छाव यांनी पोलीस अधीक्षक यांना संपर्क केल्याचे सांगून त्या कसाईला आश्वासन दिले व दुसरी घटना नाना पटोले यांनी एका मांत्रिकाच्या सांगण्यावरून एका कार्यकर्त्याच्या हातून त्यांचे पाय धुऊन घेतले म्हणून मोठी नाराजी व्यक्त केली जात आहे.

त्यामुळे भारतीय जनता पार्टी धुळे महानगर यांच्यातर्फे झाशी राणी चौक येथे आंदोलन करण्यात आले त्या आंदोलनात खासदार शोभा बच्छाव यांचा व नाना पटोले या दोघांचे प्रतिकृती बॅनर तयार करून जोडे मारो आंदोलन करण्यात आले त्या ठिकाणी या दोघांच्या विरुद्ध अनेक घोषणा देखील देण्यात आले. त्या ठिकाणी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी प्रसार माध्यमांना सांगितले की मालेगाव येथे झालेल्या गुरेढोरांच्या कारवाई संदर्भात खासदार शोभा बच्छाव यांनी कसायाच्या सांगण्यावरून मदत करण्याचा प्रयत्न केला आहे ही हिंदू धर्मासाठी वाईट गोष्ट आहे व नाना पटोले यांनी देखील एका कार्यकर्त्याच्या हातून स्वतःचे पाय धुणे हा देखील लाजिरवाणा प्रश्न आहे असे या ठिकाणी सांगण्यात आले. त्या साठी अधिकारी व कार्यकर्ते अध्यक्ष यांच्या कार्यालयाजवळ नाना पटोले व शोभा बच्छाव यांच्या प्रतिकृती फोटोला जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

# आज आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** संयुक्त राष्ट्र संघाने 21 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगदिन म्हणून घोषित केला आहे. त्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून मुख्य शासकीय योग दिनाचा कार्यक्रम दि. 21 जून 2024 रोजी सकाळी 7 वाजता तालुका क्रीडा संकुल, बल्लारपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. व्यक्तीच्या शारीरिक आणि आध्यात्मिक विकासासाठी योग विद्या सहाय्यभुत आहे. या कार्यक्रमामध्ये शाळा, महाविद्यालय मधील विद्यार्थ्यांकडून तसेच जिल्हास्तर विविध योग समिती, एन. एस. एस., नेहरु युवा केंद्र इ. युवा संघटनामार्फत योगा संबंधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर योग दिन कार्यक्रमाकरिता पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी व विविध कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी, तसेच पतंजली योग समिती, पतंजली योगपीठ संस्था, जिल्हा योग संघटनेचे पदाधिकारी आणि शहरातील नागरिक व खेळाडू उपस्थित राहणार आहे. तरी सर्व नागरिक, योगसाधक, जेष्ठ नागरिक यांनी दि. 21 जून 2024 रोजी सकाळी 6.30 वा. तालुका क्रीडा संकुल, बल्लारपूर येथे उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांनी केले आहे.

# सम्यक दृष्टी घालवते मानवाचे अज्ञान : दीपक कदम

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** मानवाला पंचेंद्रियांमुळे ज्ञान प्राप्त होते. परंतु सम्यक दृष्टी सद्विवेकाला जन्म देते. अविद्येचा विनाश हाच सम्यक दृष्टीचा उद्देश आहे. ती मिथ्या दृष्टीची विरोधीनी आहे. खऱ्या अर्थाने सम्यक दृष्टी मानवाचे अज्ञान घालवते असे प्रतिपादन येथील आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी केले. ते खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात आयोजित पौर्णिमोत्सव कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक, अखिल भारतीय भिक्खु संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरु संघनायक भदंत पंयाबोधी थेरो यांच्यासह भिक्खु संघ, आंबेडकरवादी मिशन केंद्रप्रमुख दीपक कदम, जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉक्टर सिद्धार्थ जोंधळे, अशोक धुतराज, संजय गच्चे, प्रा. मधुकर जोंधळे, नायब तहसिलदार झगडे, संदेश वाठोरे, उपप्राचार्य साहेबराव इंगोले, प्रा. विनायक लोणे, प्राचार्य श्याम रोकडे, रामानंद सावंत, इंजि. भरतकुमार कानिंदे, प्रज्ञाधर ढवळे, आप्पाराव नरवाडे यांची उपस्थिती होती.

तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त पौर्णिमोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्प व दीप पूजन करून अभिवादन करण्यात आले. याचनेवरुन भिक्खू संघाने उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले. तसेच त्रिरत्न वंदना घेण्यात आली. सकाळपासूनच परित्राणपाठ, गाथापठण, बोधीपूजा, भोजनदान, दान पारमिता, बुद्ध भीम गितांची वंदना आदी कार्यक्रम यानिमित्ताने घेण्यात आले. यावेळी पंधरा दिवस चाललेल्या ४० श्रामणेर श्रामणेरी प्रशिक्षण शिबिराचा समारोप करण्यात आला. कनिष्क जोंधळे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी व प्रशिक्षण शिबिरार्थींनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक साहेबराव इंगोले यांनी केले तर आभार भरतकुमार कानिंदे यांनी मानले. यावेळी विविध ठिकाणांहून बौद्ध उपासक उपासिका, बालक बालिका यांची उपस्थिती होती.



# विद्यार्थ्यांना मिळणार बुट व पायमोजे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मोफत गणवेश योजनेप्रमाणेच शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता 1 ली 8 वी मधील सर्व विद्यार्थ्यांना सन 2023-24 पासून दरवर्षी एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे चा लाभ शाळा व्यवस्थापन समितीकडून देण्यात येत आहे. याकरीता प्रति विद्यार्थी 170 रुपये इतकी रक्कम निश्चित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील 1610 शाळांमधील 1 लक्ष 2 हजार 425 विद्यार्थ्यांकरीता प्रति विद्यार्थी 170 रुपये याप्रमाणे एकूण 1 कोटी 74 लक्ष 12 हजार 250 रुपयांचा निधी वर्ग करण्यात आला आहे. शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरून सर्व विद्यार्थ्यांना एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजेचा लाभ देण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी कळविले आहे. शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता 1 ली ते 8 वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील मुले तसेच दारिद्र्य रेषेखालील पालकांच्या मुलांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. तसेच सन 2023-24 या शैक्षणिक वर्षापासून प्रस्तुत योजनेचा लाभ दारिद्र्य रेषेवरील पालकांच्या मुलांनासुद्धा देण्याबाबतचा निर्णय 6 जुलै 2023 च्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला. समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत मोफत गणवेश योजनेकरीता निर्धारीत केलेल्या प्रती गणवेश 300 रुपये याप्रमाणे राज्य शासनानेसुध्दा दोन गणवेशाकरीता प्रति विद्यार्थी 600 रुपये रक्कम निश्चित केली आहे.

# खा. सोनवणेंचा मॅरेथॉन बैठकांचा धडाका

## प्रशासनावर बसवली पकड : डिसेंबरपर्यंत अहिल्यानगर - बीड रेल्वे ट्रायल रन होणार पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** लोकसभा निवडणूकीत विजय मिळल्यानंतर सत्काराचे हार-तुरे घेत न बसता खा.बजरंग सोनवणे ताकतीने कामाला लागले आहे. दि.१८ जून रोजी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विभागांच्या मॅरेथॅान बैठका घेतल्या. यावेळी जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा विषय असलेल्या रेल्वेबाबतीत आढावा घेतला. डिसेंबर अखेर अहिल्यानगर ते बीड रेल्वे ट्रायल रन पुर्ण होत असल्याची माहिती दिली. तर एक वर्षात परळीपर्यंत रेल्वेचे काम पुर्ण करा, अशा सुचनाही अधिकाऱ्यांना दिल्या. मॅरेथॅान बैठकातून त्यांनी जिल्हा प्रशासनावर आपली चांगलीच पकड बसविली आहे.

खासदार बजरंग सोनवणे यांनी दि.१८ जून रोजी विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी मॅरेथॅान बैठकां घेतल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या हॉलमध्ये झालेल्या बैठकीला आ.संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, लीड बँकेचे सर्व अधिकारी, विविध बँकांचे प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. जिल्हा परिषद प्रशासनाकडे असलेल्या जलजीवन मिशन योजनेला मरगळ आलेली असून काही ठिकाणी अर्धवट कामे करून पैसे उचलले जात असल्याचे समोर येत आहे. यामुळे अधिकाऱ्यांनी कामे दर्जेदार करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत. गावात पाणी देणे हे पुण्याचे काम असून सदरील कामे करताना सामान्य माणसाला पाण्यासाठी फिरण्याची वेळ येऊ येणार नाही अशा सूचना केल्या. अशा काही तक्रारी आल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही, असे म्हणत अर्धवट कामांची पंधरा दिवसात प्रगती दाखविण्याच्या सुचना त्यांनी दिल्या. शिवाय जलजीवन योजनेसाठी लागणारा निधी आणण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करू, पैशाची काळजी करू नका, असेही म्हटले. याच बरोबर राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना, सर्व शिक्षा अभियान आणि बचत गटांचाही आढावा घेण्यात आला.बचत गटाच्या माध्यमातुन केंद्र शासकीय योजना अधिकाधिक कुटुंबापर्यंत पोचवणार, असा शब्दही खा.सोनवणे यांनी दिला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी वासूदेव सोळंके, डॉ.उल्हास गुंडाळ, शिक्षणाधिकारी फुलारी, शिंदे यांची उपस्थिती होती. यानंतर रेल्वे अधिकाऱ्यांच्या बैठकीस आहिल्यानगर येथील रेल्वे विभागाचे उपमुख्य अभियंता श्री. आर.के.यादव व रेल्वेचे सर्व अधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी खा.सोनवणे यांनी आढावा घेत जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या रेल्वे प्रश्नावर चर्चा केली. यावेळी डिसेंबरपर्यंत अहिल्यानगर ते बीड रेल्वे ट्रायल रन पुर्ण होणार असे त्यांनी ठामपणे सांगितले. याच बरोबर बीड- परळी रेल्वे मार्गाचे काम एक वर्षाच्या आत पुर्ण करा, रेल्वेचे कार्र्यालय बीड येथे आणन्यासाठी करावयाच्या योजनाची माहिती घेतली. त्यासाठी जे जे करता येईल ते करा, भुसंपादनाचे विषय तातडीत मार्गी लावा अशी तंबीही अधिकाऱ्यांना दिली. यावेळी लीड बँकेची देखील बैठक घेण्यात आली. जिल्ह्यात शेतकऱ्यांना वेळेत पीककर्ज द्या, कोणत्याही शेतकऱ्याची अडवणूक झाल्याची तक्रार आली किंवा त्यात तथ्य आढळले तर गाठ माझ्याशी आहे, असा इशाराही त्यांनी दिला.

**रखडलेली कामे सुरू करा :** जिल्ह्यात राष्ट्रीय महार्गाची बहूतेक कामे रखडली आहेत . यात पैठण-पंढरपूर, खरवंडी- नवगण राजूरी, अहमदपूर- चुंबळी, परतूर- बार्शी, लातूर-पाथरी, अहमदनगर- बीड-परळी, गंगाखेड, खरवंडी कासार- पाडळसिंगी या रस्त्यांचा समावेश आहे . सदरील कामे येत्या सहा महिन्यात पुर्ण करा, जिल्ह्यातील नागरिकांच्या जिवीताशी खेळू नका, अशा सुचनाही खा .सोनवणे यांनी दिल्या .केज शहरातुन जाणाऱ्या दोन्ही राष्ट्रीय महामार्गाच्या थांबलेल्या कामांची गती वाढवुन गतीने कामे पुर्ण करणार आणि धारुर घाटातील रुंदीकरणाचे तसेंच उर्वरित काम वेगाने पूर्ण करुन घेणार, असेही ते म्हणाले .

जिल्ह्यातील मराठा समाजातील तरूणांना उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी अण्णासाहेब पाटील महामंडळाकडून कर्ज द्या, त्यांना स्वतःच्या पायावर उभा राहू द्या, असेही खा.सोनवणे म्हणाले.

खा.सोनवणे म्हणाले, चर्चा नको, काम दाखवा.. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या बैठकीत रस्त्याचे कामे संथगतीने सुरू आहेत. बैठकीत पालखी मार्ग असलेल्या पैठण-पंढरपूर मार्गाच्या विषयाला खा.सोनवणे यांनी हात घातला. या मार्गातील पाटोदा तालुक्यातील मळेकरवाडी घाटाचे काम अनेक वर्षापासुन रखडले होते. सदरील काम तातडीने सुरू करा, असे त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. यानंतर एक तासात सदरील काम सुरू करण्यात आले. यावेळी कार्यकारी अभियंता अशोक इंगळे, सुर्यकांत गलांडे, सुनिता वनवे, प्रविण सुमंत, यांची उपस्थिती होती.



# विद्यार्थ्यांनी कष्ट, आत्मविश्वास बाळगत यश संपादन करावे

## डॉ. सीताराम जाधव यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय व रामराव पाटील बहिरगावकर एम. सी.व्ही. सी. कनिष्ठ महाविद्यालय, कन्नड येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजर्षी शाहू प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ . सितारामजी जाधव साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अशोकरावजी आहेर आण्णा हे होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय एन. भोसले, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, उपप्राचार्य प्रा. अभय आहेर व डॉ . सदाशिव पाटील यांची मंचावर प्रमुख उपस्थित होती.

प्रमुख पाहुणे मा. डॉ. सितारामजी जाधव यांनी आपल्या विद्यार्थी दशेतील संघर्षाचे दाखले देत, प्रेरणादायी विचार मांडले. विद्यार्थ्यांमध्ये इच्छाशक्ती असेल तर कोणतीही परिस्थिती आडवी येऊ शकत नाही. ग्रामीण विद्यार्थ्यांनी कष्ट आणि आत्मविश्वास बाळगत हे यश संपादित करावे. असे म्हटले. तर प्राचार्य डॉ. विजयन एन. भोसले सर यांनी आपल्या मनोगतात, "आजच्या जागतिकीकरणाच्या युगामध्ये अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत, या संधींचा फायदा गुणवत्ते शिवाय घेणे शक्य नाही. तेव्हा आजच्या या युगात मुलांनी गुणवत्ता प्राप्त करणे गरजेचे आहे. तसेच कौशल्यावर आधारित शिक्षण प्राप्त केले पाहिजे, कारण विद्यार्थ्यांची गुणवत्ता हाच आजच्या जागतिक युगाचा पासवर्ड बनवत आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी ज्ञानकेंद्री बनले पाहिजे, जगातील एक नंबर एम.आय.टी. तसेच अमेरिकेतील विविध विद्यापीठे, संस्था आणि महाविद्याल यांना नुकतीच त्यांनी भेट दिली आहे. तेव्हा अमेरिकेतील शिक्षण पद्धती आणि व्यवस्थेविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. यावेळी 12 वी कला, वाणिज्य व विज्ञान तसेच एम.सी. व्ही. सी.च्या गुणवंत विद्यार्थ्यां सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये नीट परीक्षेमध्ये 720 पैकी 643 गुण संपादित केलेला चि. मितवा राजानंद सुरडकर विज्ञान शाखातील कु. चौधरी संतोषी सचिन,कु. आव्हाळे रचना पोपटराव, कु. पाटे अनुष्का विनोद.कला शाखातील कु. दाभाडे शितल संजय,कु. दापके आरती जगन , कु. पवार निकीता पुजाहरी वाणिज्य शाखातील कु. गोसावी गायत्री शामशीर, गावंडे पवन , क्षिरसागर रोहीत आदिनाथ, इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी विभागातील चि. शिरसे संतोष आण्णा,चव्हाण दीपक बाबासाहेब,कातकर अनिकेत सुभाष , मेकॅनिकल टेक्नॉलॉजी विभागील मोरे विकी सुनील, चव्हाण गणेश भारत ,पठान तौफीक अहमदखॉ ,इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी विभागातील कु.पुनम आत्माराम गवळी,राहुल मनोज झोंड, कु.जयश्री जनार्दन शिंदे आदी गुणवंत विद्यार्थ्यां व पालकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुस्तक आणि पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.अभय आहेर, सूत्रसंचालन डॉ. प्रकाश खेत्री यांनी केले प्रा. अभिजीत मांडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रमास कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी तसेच पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

# उरण चारफाटा ते नवीन शेवा दरम्यान गतिरोधक बसवण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यात अपघातांचे वाढते प्रमाण व अपघातामुळे मृत्यूचे वाढते प्रमाण लक्षात घेता खबरदारीचा उपाय म्हणून तसेच उपाययोजनेचा भाग म्हणून उरण चारफाटा ते नविन शेवा या मार्गावर गतिरोधक बसविण्यात यावेत.चारफाटा, आदय क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके हायस्कूल, नवीन शेवा गाव आदि ठिकाणी गतिरोधकांची नितांत गरज आहे. ही गरज ओळखून शेतकरी कामगार पक्षाचे उरण विधानसभा अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते मयूर सूतार यांनी सिडको प्रशासनाकडे या मार्गावर त्वरित गतिरोधक बसविण्याची मागणी प्रत्यक्ष भेटून तसेच पत्रव्यवहाराद्वारे केली आहे. रात्री अपरात्री अनेक वाहने कोणतेही नियम न पाळता वाहने जोरात पळवितात त्यामूळे अपघात होतात.त्या अपघातात एखाद्याचा मृत्यू होतो. म्हणून हे सर्व प्रकार थांबविण्यासाठी मयूर सूतार यांनी उरण



चारफाटा ते नविन शेवा मार्गावर ( मूख्य रस्त्यावर )गतिरोधक बसविण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

# ठाणे जिल्ह्यात मुसळधार पाऊस; जागोजागी पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** जिल्ह्यात गुरुवारी पहाटेपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. या पावसामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचले होते. ठाणे शहरात सकाळी ८.३० ते ९.३० या एक तासाच्या कालावधीत २६.४२ मिमी पाऊस पडला असल्याची नोंद ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे करण्यात आली आहे.

जून महिना सुरू होऊन पंधरा दिवस उलटून गेले तरी शहरात पुरेशा प्रमाणात पावसाने हजेरी लावली नव्हती. यामुळे वातावरणातही उकाडा कायम होता. या उकाड्याने नागरिक देखील हैराण झाले होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# ज्याच्यांवर अपार माया केली त्यांनीच दगा दिला

## खासदार वसंत चव्हाण यांचे प्रतिपादन : भोकरला जाहीर सभा

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** माझी निष्ठा काँग्रेस पक्षावर असल्याने पक्षाला अडचणीच्या काळात साथ देण्यासाठी लोकसभेची उमेदवारी स्विकारली आहे. येथील मतदारांनी काँग्रेस पक्षाचा गड कायम ठेवण्यासाठी धनदांडग्याना बाजुला सारुन माझ्या सारख्या सामान्य माणसाला विजयी केले. ज्यांच्यावर अपार माया केली त्यांनी एकाच रात्रीतून दगा दिला. भाजपात जाऊन काय साध्य केलं? असा सवाल काँग्रेसचे नवनिर्वाचित खासदार वसंत चव्हाण यांनी बुधवारी ( ता.१९ ) केला आहे.
शहरातील शासकीय विश्रामगृहाच्या प्रांगणात झालेल्या श्रूणनिर्देश सभेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बी.आर.कदम होते. विचारमंचावर बबन बारसे, रेखाताई चव्हाण, बाळासाहेब पाटील रावणगावकर, गोविंद बाबा गौड पाटील,प्रकाश देशमुख भोसीकर, सुभाष किन्हाळकर,तौसीफ इनामदार, शिवाजी पांचाळ, शिवाजी पाटिल लगळूदकर, निळकंठ वर्षेवार, भीमराव दूधारे, पप्पू कोंडेकर, गिरीश पाटील रावणगावकर, संदिप पाटील गौड, शिवाजी कदम, आदिनाथ चिंताकुठे, मकसूद गोंदवाले, अप्पाराव राठोड, आनंद चिठ्ठे, सतीष देशमुख, शमीम बेगम, कमल नर्तावार, सुरेखा माळे यांची उपस्थिती होती. चव्हाण म्हणाले की,मागील पन्नास वर्षांपासून काँग्रेस पक्षाची धूरा सांभाळली तेच मंडळी आता भाजपाच्या वळचणीला जाऊन बसले आहेत. मी त्यांच्याच तालमीत राजकारणात मोठा झालो. त्यांनी दिलेले डावपेच आज मला कामी आलेत. माझ्या विजयात सर्वच मित्रपक्ष, मतदार, पदाधिकाऱ्यांचा सिंहाचा वाटा आहे. जनतेनी माझ्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. नांदेडसह इतर तालुक्यात विविध विकासात्मक कामे मार्गी लावायची आहेत त्यासाठी मी प्रयत्न करीन.भविष्यात असेच सहकार्य राहू द्या अशी आशा व्यक्त केली आहे. प्रास्ताविक तालुका काँग्रेसचे अध्यक्ष गोविंद बाबा गौड पाटील यांनी प्रास्ताविक केले.शिवाजी पाटील लगळूदकर यांनी सुत्रसंचलन केले.
कुबड्याच सरकार टिकणार नाही
नांदेड लोकसभा मतदारसंघातील जनतेनी मला खासदार केल. दुसरीकडे राज्यसभेत अशोक चव्हाण आहेत. सत्ता त्यांची असल्याने विकासकामाचा निधी मिळवण्यासाठी कसरत करावी लागणार आहे. तुम्ही चिंता करू नका कुबड्या घेऊन केलेली सत्ता फार काळ टीकणार नाही.तुम्ही दिल्या घरी सुखी रहा.घरवापसी येणा-यासाठी दार बंद झाली आहेत.असे मत खासदार वसंत चव्हाण यांनी व्यक्त केले आहे.

# अवैध वाळूवर अंकुश न ठेवणे अधिकाऱ्यांना भोवणार : उपायुक्तांनी दिले चौकशीचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव ताजा :** तालुक्यातील खडकपूर्णा नदी पात्रातून शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने अवैध गौण खनिज उत्खनन वाहतुकीच्या अनुषंगाने महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर प्रशासकीय व फौजदारी कारवाई करण्यात यावी अशा तक्रारीनंतर ही प्रशासनाकडून कार्यवाही जाणून बुजून विलंब होत असल्याची तक्रार महाराष्ट्र शासन युवा सामाजिक पुरस्कार प्राप्त चंद्रकांत खरात यांनी लोकायुक्त मुंबई यांच्याकडे केली होती. प्रस्तुत प्रकरणांची गंभीर दखल घेत सदर प्रकरणात महसूल उपायुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय चौकशीचे आदेश दिले आहे.
सिंदखेडराजा उपविभागात खडकपूर्णा नदी पात्रात सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक ही अधिकारी कर्मचारी व वाळू माफिया यांच्यातील संगनमताने होत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करून त्यांच्यावर वाळू प्रकरणी संबंधित दोषी महसूल अधिकारी व कर्मचारी, खानिकर्म विभाग अधिकारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करा अशी मागणी महाराष्ट्र शासन युवा सामाजिक पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी केली होती. सदर प्रकरणाची दखल घेत महसूल उपायुक्त अमरावती संजय पवार यांच्या कडे बुलढाणा जिल्हाधिकारी यांनी २५ सप्टेंबर २०२३ रोजी एका पत्राद्वारे तत्कालीन तहसीलदार श्याम धनमने, नायब तहसीलदार विकास राणे, तत्कालीन मंडळ अधिकारी पी.पी वानखडे, एन एल वायडे, तलाठी एस.डी सानप,तत्कालीन तलाठी एच डि दांडगे यांच्यावर अवैध रेती उत्खनन व वाहतुकीवर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण ठेवले नसल्याचा ठपका ठेवत संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांविरुद्ध सामूहिक विभागीय चौकशी सुरू करण्याकरिता शसनास प्रस्ताव सादर केला.या अहवाला वरून अवर सचिव महसूल यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर अवैध उत्खननावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवले नसल्याने संबंधितावर सामूहिक विभागीय चौकशी सुरू करण्यात करिता स्वतंत्र दोषारोप १ ते ४ सादर केले. याचबरोबर जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्यामार्फत १ नोव्हेंबर २०२३ अन्वये तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, तत्कालीन उपविभागीय अधिकारी भूषण अहिरे, तत्कालीन जिल्हा खनिकर्म अधिकारी व्ही पी राठोड, तत्कालीन प्रभारी जिल्हा खनीकर्म अधिकारी पि.के करे,एस एच भांबळे, यांचे विरुद्ध शिस्तभंगाचे कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयास सादर केला. सदर प्रकरणात प्रशासकीय स्तरावर कारवाईस हेतू पुरस्कर विलंब केला जात असल्याबाबत ची तक्रार सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी लोकायुक्त आणि उपायुक्त महसूल विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे केली व सदर प्रकरणात तात्काळ विभागीय चौकशी करून कारवाईची मागणी केली होती. सदर प्रकरणात शासनाचे अवर सचिव महसूल व वन विभाग संजीव राणे यांनी एका आदेशाद्वारे संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना शिस्तभंग विषयक प्रकरणांमध्ये संयुक्तपणे जबाबदार धरून महाराष्ट्र शासन नागरी सेवा ( शिस्त व अपील ) नियम १९७९ च्या नियम १२ चा पोटनियम ( १ ) व ( २ ) द्वारे प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून मुक्त सर्व शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई सामायिक विभागीय चौकशी द्वारा करण्यात येईल, संयुक्त कार्यपद्धतीच्या प्रायोजनाबाबत शासन शिस्तभंग विषयक प्राधिकारी म्हणून काम करील आणि महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षा लावण्यास सक्षम राहील. असे आदेश पारित केले आहे. एक वर्षापासून सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुरावा शासनाकडे सादर केलेली सक्षम कागदपत्रे या आधारावर महसूल आणि खनिकर्म अधिकारी व कर्मचाऱ्याच्या चौकशीचे आदेश पारित केले आहे.

# त्वचापेढी नसल्याने जळालेल्या रुग्णांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर:** नागपूरसह मध्य भारतात गंभीररित्या जळालेल्या रुग्णांवर उपचारासाठी आवश्यक असलेली त्वचा पेढी उपलब्ध नसल्याने मृत्यूचे प्रमाण वाढत आहे.
भारतासह जगभरात सध्या जळालेल्या रुग्णांवर उपचारासाठी नवनवीन तंत्र विकसित होत आहेत. त्यापैकी एका तंत्रानुसार, कमी प्रमाणात जळालेल्या रुग्णाच्या जखमेवर त्याच्या शरीराच्या इतर भागातील त्वचा काढून लावली जाते. रुग्णाची स्वतःची त्वचा उपलब्ध नसल्यास त्वचा पेढीतून त्वचा मिळवली जाते. अशी त्वचा लावल्याने संक्रमणाची शक्यता कमी होते. सुमारे १४ दिवसांनंतर हळूहळू ही त्वचा रुग्णाच्या शरीराद्वारे नाकारली जाते. त्यानंतर इतर उपचार केले जातात. दिल्ली, मुंबई, पुण्यात त्वचा पेढीमुळे मृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. दरम्यान, नागपुरात दोन शासकीय व दोन खासगी वैद्यकीय महाविद्यालयांसह अनेक मोठी खासगी रुग्णालये आहेत. परंतु येथे एकही त्वचा पेढी नाही. बाजारगावच्या सोलार एक्सप्लोसिव्ह आणि धामनातील चामुंडी कंपनीत झालेल्या स्फोटात १७ हून अधिक बळी गेले. यापैकी काहींचा उपचारादरम्यान संक्रमणाने मृत्यू झाला. नागपुरात त्वचा पेढी असती तर या जखमींना वाचवता येऊ शकले असते. रोटरी क्लब, ऑरेंजसिटी रुग्णालय, नॅशनल बर्म सेंटर (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने नागपुरातील पहिली त्वचा पेढी ऑरेंज सिटी रुग्णालयात २०१४ मध्ये सुरू झाली होती. ही देशातील चौथी त्वचा पेढी होती. परंतु त्वचा दाते मिळत नसल्याने व खर्च परवडत नसल्याने ती बंद झाली. मेडिकल प्रशासनाने ही त्वचापेढी चालवण्याची तयारी दाखवल्यावर येथील यंत्र मेडिकलमध्ये पाठवण्यात आले. परंतु आर्थिक आणि इतर कारणांनी यंत्र पडूनच राहिले. मध्यंतरी तंत्रज्ञ बोलावून यंत्राची तपासणी केली असता ते कालबाह्य झाल्याचे पुढे आले. त्यामुळे येथील त्वचा पेढीचा प्रस्ताव बारगळला. विदर्भात शस्त्रांची निर्मिती करणाऱ्या काही आयुध निर्माणी आहेत. येथे लष्करी वापरासाठी बॉम्ब, अग्निबाण, बॉम्बचे कवच आणि अन्य शस्त्रे तयार होतात.

# शहर पोलीस भरतीत पावसाचा व्यत्यय

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शहर आणि ग्रामीण पोलीस दलातील शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेला बुधवारी सकाळी साडेपाच वाजता वेगवेगळ्या मैदानांवर सुरुवात झाली. ग्रामीण दलात पहिल्या दिवशी ३०५ उमेदवार अनुपस्थित राहिले. ३९५ उमेदवारांची मैदानी चाचणी पार पडली. शहर भरतीत २१४ उमेदवार गैरहजर होते. २८४ जणांची चाचणी पार पडली. ग्रामीणची चाचणी एक वाजेपर्यंत आटोपल्याने पावसाची झळ बसली नाही. शहर भरतीत पावसामुळे व्यत्यय आला. दुपारी संततधार सुरू राहिल्याने दीड तास मैदानी चाचणी थांबवावी लागली.
शहर पोलिसांच्या आस्थापनेवरील ११८ रिक्त पदांसाठी मैदानी चाचणी पंचवटीतील मिनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुलात तर, ग्रामीण पोलीस दलातील ३२ पोलीस शिपाई पदांसाठी मैदानी चाचणी आडगावस्थित पोलीस मुख्यालयाच्या मैदानात होत आहे. सकाळपासून दोन्ही ठिकाणी उमेदवारांची गर्दी झाली. शहर आस्थापनेवरील भरतीसाठी एकूण ७७१७ उमेदवार असून पहिल्या दिवशी यातील ५०० उमेदवारांच्या मैदानी चाचणीचे नियोजन होते. ग्रामीण पोलीस दलात ३२२५ उमेदवार असून पहिल्या दिवशी ७०० उमेदवारांची चाचणी घेतली जाणार होती. या प्रक्रियेसाठी ३९५ उमेदवार उपस्थित राहिले. उर्वरित ३०५ उमेदवार गैरहजर राहिल्याचे पोलीस उपअधीक्षक (गृह) नितीन गोकावे यांनी सांगितले. तशीच स्थिती शहर पोलीस दलाच्या प्रक्रियेत होती. ५०० पैकी २८४ उमेदवारांची चाचणी झाली. तर २१४ उमेदवार गैरहजर राहिले. १० उमेदवारांच्या गटानुसार ही प्रक्रिया पार पडली. शैक्षणिक कागदपत्रांची पडताळणी, शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी या पध्दतीने ही प्रक्रिया पार पडत आहे. मैदानी चाचणीत उमेदवारांची छाती, उंची, १०० मीटर धावणे, १६०० मीटर धावणे (पुरुष), ८०० मीटर धावणे (महिला) व गोळा फेक यांचे मूल्यमापन करण्यात आले. ऊन व पावसाला उमेदवारांना तोंड देता येऊ नये म्हणून दोन्ही ठिकाणी जलरोधक तंबुंची उभारणी करण्यात आली आहे. सहभागी उमेदवारांसाठी नाश्ता, पाण्याची व्यवस्था करण्यात आल्याचे पोलीस उपायुक्त चंद्रकांत खांडवी यांनी सांगितले. तशीच व्यवस्था आडगावच्या मैदानावर आहे. दुपारी अकस्मात पावसाला सुरुवात झाल्याने मैदानी चाचणी सुमारे दीड तास थांबवावी लागली. मिनाताई ठाकरे क्रीडा संकुलात सिंथेटिक ट्रॅक असल्याने पावसाने उघडीप घेतल्यानंतर लगेचच चाचणीची प्रक्रिया पार पडल्याचे खांडवी यांनी सांगितले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर